रायगड, शनिवार दि. २५ नोव्हेंबर २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

महिलांची दिघी पोर्टला धडक

पान ३ वर

रम्य तो कार्तिक

पान ८ वर

डिजिटल युगातला
कॉलेज-रेडीनेस
शिकवणारा एकमेव कोर्स!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
mscit.mkcl.org
प्रवेशासाठी आजच MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

आजचा अग्रलेख
एक छोटीशी विश्रांती

प्रकल्पाविरोधात नाही; शहापूरवासियांचा खुलासा

विरोध फसवाफसवीला

। अलिबाग । प्रतिनिधी । टाटा पॉवर प्रकल्पाच्या नावाखाली शेतकऱ्यांची यापूर्वी मोठी निराशा झाली आहे. सुविधांपासून शेतकरी वंचित राहिला आहे.त्यातच पेपर मिलपर्यंत रस्ता जाण्यासाठी शहापूरमधील जमीन मोजणीचा प्रकार गुरुवारी महसूल अधिकारी व एमआयडीसी अधिकाऱ्यांकडून करण्यात आला. त्यामुळे आम्हाला आंदोलन करावे लागले. शेकापच्या नेत्यांनी या आंदोलनाला भक्कम साथ दिली. आमचा प्रकल्पाला विरोध नाही, मात्र त्यात होणाऱ्या फसवाफसवीला विरोध आहे, असे शहापूरमधील शेतकऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

प्रस्तावित औद्योगिक विकास प्रकल्पासाठी एमआयडीसीने शहापूरमधील सुमारे ७०० हेक्टर जमीन घेण्याचा डाव आखला आहे. यातील २३ हेक्टर जमीन पेपर मिल कंपनीपर्यंत रस्ता करण्याच्या नावाखाली घेण्याचा प्रयत्न सुरु आहे.

शेतकऱ्यांनायाबाबतकोणतीहीपूर्वसूचना न देता गुरुवारी सकाळी या जमिनीची मोजणी करण्याचा प्रयत्न झाला. शहापूरमधील शेतकरी भात पिकाची लागवड करतात. प्रशासनाने कोणतीही माहिती न देता या शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर एमआयडीसीचा शिक्का मारला. या शिक्क्यामुळे शेतकऱ्यांसाठी असलेला सरकारी योजनांचा लाभ घेता

येत नाही. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत २०२२ मध्ये बैठक झाली होती. त्या बैठकीत शेतकऱ्यांनी ठाम भूमिका घेऊन बाजारभावाप्रमाणे मोबदला देण्याची मागणी केली. त्यावेळी सकारात्मक चर्चा झाली. त्यानंतर गुरुवार दि. २३ नोव्हेंबर २०२३ रोजी अचानक जमीन मोजणीसाठी अधिकारी आले.सरकारच्या या भूमिकेबाबत शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

टाटा पॉवर प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या. ही जमीन नापीक झाली आहे. शेतकरी देशोधडीला लागण्याच्या वाटेवर असतानाही बळजबरीने शेतकऱ्यांकडून विकासाच्या नावाखाली जमीनी संपादित करणे, त्यावर हक्क गाजवून फसवणूक करणे या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रशासन व सरकारविरोधात असंतोष असल्याचे स्पष्ट होऊ लागले आहे.

धेरंड गावचे शेतकरी अनिल म्हात्रे यांची शहापूर परिसरात सुमारे दोन एकर जमीन आहे. या जमिनीत ते भात करतात. त्यांच्या सातबाऱ्यावर एमआयडीचा शिक्का लागला हे त्यांच्या २०१९ मध्ये लक्षात आले. प्रशासनाने कोणतीही माहिती न देता एमआयडीसीचा शिक्का त्यांच्या सातबाऱ्यावर लावल्याने खूप मोठे नुकसान केले आहे. 'ते म्हणाले की, प्रकल्प उभारणीला आमचा विरोध नाही, मात्र योग्य मोबदला, नोकरी, साडेबावीस टक्के भूखंड, रुग्णालय, शैक्षणिक सुविधा पुरविण्याबरोबरच गावात वेगवेगळ्या योजना राबविणे हे व्हायला हवे. शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच चर्चा करून ➤ पान २ वर

राज्यात पावसाची शक्यता

। मुंबई । वृत्तसंस्था ।

राज्यात पुढील काही दिवस पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने पुढील ३-४ दिवस पावसाचा अंदाज वर्तवला आहे. राज्यात पुण्यासह कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसाची शक्यता आहे. याशिवाय मुंबईतही २५ आणि २६ नोव्हेंबरला पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. मुंबईसह इतर भागांमध्ये हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे.

बंगालच्या उपसागरात तयार होऊ घातलेल्या चक्रीवादळामुळे रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मध्य महाराष्ट्रातील अहमदनगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर आणि मराठवाड्यातील धाराशिव, लातूर जिल्ह्यात जोरदार वारे, विजांसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. नाशिक, बीड, नांदेड जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता आहे. रविवारी उत्तर महाराष्ट्रात काही ठिकाणी गारपीट होण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.

वेधक

सुनावणी तहकुबीस न्यायालयाचा नकार

मुंबई : महाराष्ट्र सदन बांधकाम घोटाळा प्रकरणी यापुढे विनाकारण सुनावणी तहकूब करणार नाही, अशा स्पष्ट शब्दात मुंबई सत्र न्यायालयाने मंत्री छगन भुजबळांना सुनावले आहे. या प्रकरणात पुढील सुनावणी ११ डिसेंबर रोजी होणार आहे. सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) २०१६ साली भुजबळ यांच्यासह एकूण ५२ आरोपींविरुद्ध ८५० कोटींचा महाराष्ट्र सदन बांधकाम घोटाळा व इतर गैरव्यवहार प्रकरणात गुन्हा दाखल केला आहे. भुजबळांना सत्र न्यायालयाने फटकारताना लोकप्रतिनिधींवरील खटले जलदगतीने मार्गी लावावीत,असे सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश ➤ पान २ वर

जिल्हा न्यायालयातही 'व्हिडिओ कॉन्फरन्सिंग'

नागपूर : सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयातील 'डिजिटलायझेशन'ची प्रक्रिया वेगवान केल्यावर आता राज्यातील जिल्हा आणि तालुका न्यायालयांनाही अद्ययावत करण्यात येत आहे. जिल्हा व तालुका न्यायालयात 'व्हिडिओ कॉन्फरन्सिंग'ची व्यवस्था करण्यात येणार आहे. राज्यात यासाठी पाचशे सॉफ्टवेअर लायसेंस खरेदी करण्यात येतील. राज्य शासनाच्या वतीने यासाठी एक कोटी रुपयाचा निधी मंजूर केला आहे. राज्याच्या विधी आणि न्याय विभागामार्फत याबाबतचे परिपत्रक जाहीर करण्यात आले. ➤ पान २ वर

जेवण उशिरा दिल्याने चॉपरने हल्ला

ठाणे : हॉटेलमध्ये जेवणाची ऑर्डर दिल्यानंतर ती आणण्यास उशीर झाल्याने टेबल उलटवून हॉटेलमध्ये धिंगाणा घालणाऱ्या तिघांविरोधात कासारवडवली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. आरोपी फरारी असून त्यांचा पोलिस शोध घेत असून सर्व प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे. या वेळी चॉपर हल्ल्यात हॉटेलमधील दोघे जण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे. ब्रह्मांडच्या आझादनगर परिसरात 'सागर गोल्डन हिल टॉप' हे तक्रारदार संतोष कोरगय्या शेट्टी यांचे हॉटेल आहे. या हॉटेलमध्ये बुधवारी (ता. २२) ➤ पान २ वर

आज-उद्या अनेक रेल्वे गाड्या रद्द

। मुंबई । वृत्तसंस्था ।

पुणे-मुंबई रेल्वे मार्गावर धावणाऱ्या अनेक गाड्या शनिवारी व रविवारी (२५, २६ नोव्हेंबर) बंद ठेवण्यात येणार आहेत. मध्य रेल्वेच्या लोणावळा-पुणे विभागात खडकी-शिवाजीनगरदरम्यान विविध कामे करण्यात येणार असल्यामुळे डेक्कन क्वीन, सिंहगड एक्स्प्रेस, इंटरसिटी एक्स्प्रेससह अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

अनेक मेल-एक्स्प्रेस गाड्या रद्द केल्या आहेत, तर काही गाड्या वेगळ्या मार्गावर वळवल्या

आहेत. २५ नोव्हेंबर २०२३ रोजी सीएसएमटी-पुणे डेक्कन क्वीन, सीएसएमटी-पुणे सिंहगड एक्स्प्रेस रद्द झाली आहे. २६ नोव्हेंबर २०२३ रोजी सीएसएमटी-पुणे इंटरसिटी एक्स्प्रेस, सीएसएमटी-पुणे डेक्कन एक्स्प्रेस, सीएसएमटी-कोल्हापूर कोयना एक्स्प्रेस या गाड्यासुध्दा रद्द करण्यात आल्या आहेत. शनिवारी काही गाड्यांना विलंब होणार आहे. बेंगळूरु -सीएसएमटी उद्यान एक्स्प्रेस सोलापूर विभागात २ तास ४० मिनिटे उशिराने येईल. बंगळूर-गांधीधाम एक्स्प्रेस पुणे-सातारा विभागात एक तासानंतर नियमित केली जाईल. रविवारी सीएसएमटी-चेन्नई एक्स्प्रेस मुंबई विभागात अडीच तास उशिराने येईल.

● नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ धावपट्टीच्या कामाला वेग आला आहे. (छायाचित्र : राजेश डांगळे)

तुळजाभवानी देवीचे दागिने वितळविणार

। धाराशिव । वृत्तसंस्था ।

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या चरणी भाविकांनी मोठ्या श्रध्देने अर्पण केलेले सोन्या-चांदीचे दागिने वितळविण्यास विधी व न्याय विभागाने मंजुरी दिल्यानंतर आता नियमावली तयार करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. २००९ ते २०२२ या काळात भाविकांनी अर्पण केलेले २०७ किलो सोने व दोन हजार ५७० किलो चांदीचे दागिने वितळविण्यासाठी शिर्डी येथील साईबाबा संस्थानकडून जशी प्रक्रिया अवलंबली जाते, त्याच पारदर्शी पध्दतीने तुळजाभवानी मंदिर संस्थानची नियमावली तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी सात सदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून ही समिती शिर्डी संस्थानला रवाना झाली आहे.

राज्यासह परराज्यातील भाविकांनी तुळजाभवानी देवीच्या चरणी अर्पण केलेल्या सोन्या-चांदीच्या वस्तू आणि ➤ पान २ वर

अभ्युदय बँकेचे संचालक बरखास्त

। मुंबई । वृत्तसंस्था ।

भारतीय रिझर्व्ह बँकेने अभ्युदय को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळावर कारवाई केली आहे. बँकेच्या संचालक मंडळाला १२ महिन्यांच्या कालावधीसाठी हटवण्यात आले आहे. सहकारी बँकेत मोठ्या प्रमाणावर निम्न मध्यमवर्गीयांची खाती आहेत. बँकेवर कारवाई झाल्याने ग्राहकांमध्ये सध्या चिंतेचे वातावरण आहे.

आरबीआयकडून बँकेवर कोणतेही व्यावसायिक निर्बंध घातलेले नाहीत. बँकेचे व्यवहार सुरळीत राहणार आहेत. त्यामुळे ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

रिझर्व्ह बँकेकडून बँकेच्या कारभाराचे व्यवस्थापन करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाचे माजी मुख्य महाव्यवस्थापक सत्यप्रकाश पाठक यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रशासकासोबतच आरबीआयकडून सल्लागारांची समिती देखील नियुक्त करण्यात आली आहे.

'पक्षावर ताबा मिळवण्यासाठी अजित पवारांनी कट रचला'

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

हा पक्षाच्या अध्यक्षपदाचा वाद नसून एका गटाला पक्षावर ताबा हवा आहे, त्यासाठी हा कट रचला गेला, असा गंभीर आरोप शरद पवार गटाचे वकील देवदत्त कामत यांनी शुक्रवारी केला.

राष्ट्रवादी काँग्रेसमधील पक्ष आणि चिन्हाच्या वादावर निवडणूक आयोगासमोर सध्या सुनावणी सुरु आहे. सुनावणीत शुक्रवारी शरद पवार गटाच्या वकिलांकडून जोरदार युक्तिवाद करण्यात आला. अजित पवारांकडे पक्षात किंवा संघटनेत कुठलीही जबाबदारी नाही. महाविकास आघाडी सरकारमध्ये ते पक्षाचे नेते होते, पण अजित पवारांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील सर्व सत्ता हवी आहे, म्हणून त्यांनी प्रफुल्ल पटेल

यांच्याशी संपर्क साधला. दिल्लीत पार पडलेल्या आठव्या अधिवेशनाच्या दरम्यान शरद पवारांची अध्यक्ष म्हणून निवड करताना प्रस्तावक म्हणून प्रफुल्ल पटेल होते. आता मात्र पवारांच्या अध्यक्षपदाच्या निवडीला ते बेकायदेशीर म्हणत आहेत, असे कामत म्हणाले.

अजित पवार यांच्या वतीने जेव्हा दुसरा गट स्थापन करण्यात आला, तेव्हा

■ शरद पवार यांच्या वकिलांचा आयोगासमोर आरोप

त्यांनी थेट आपले अध्यक्षपदासाठी नाव निश्चित केले. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घटनेनुसार कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही. अध्यक्षपदावर त्यांनी दावा करत स्वतःला अध्यक्ष म्हणून घोषित केले, पण हे चुकीचे असून घटनेला धरून नाही. अजित पवार यांची राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड करताना कुठलीही निवडणूक पार पडलेली नाही. अजित पवार यांची राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड करताना नियम पाळले गेले नाहीत,'' असे कामत यांनी आयोगाच्या निर्दशनास आणले.

१४ वर्षीय मुलीची इंस्टाग्रामवर बदनामी

। नवी मुंबई । वृत्तसंस्था ।

इयत्ता नववीत शिकणाऱ्या एका १४ वर्षीय मुलीची इंस्टाग्रामवर बदनामी करून तिला आत्म हत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दोघांविरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

करंजाडे येथे राहणारी १४ वर्षीय तरुणी कामोठे येथे नववीच्या वर्गात शिक्षण घेत होती. एक नोव्हेंबर रोजी तिची आई घरी आली असता मुलीने दरवाजा न उघडल्याने त्यांनी दुसऱ्या चावीने दरवाजा उघडला. त्यावेळी मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे दिसले. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली होती. याप्रकरणी अधिक चौकशी केली असता ऑक्टोबर महिन्यात शाळेतील वर्गात एका विद्यार्थ्याने पाठीमागून पाठीला हात लावत असलेला फोटो 'काइन मास्टर' या व्हिडिओ मेकर ॲपवर एक व्हिडीओ एडिट केला होता. तसेच खाली अश्लील शब्द लिहून वेगवेगळ्या दोन इन्स्टा आयडीवरून तो प्रसारित केला होता. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

'म्हाडाच्या ११ हजार घरांच्या किमती कमी करणार'

गृहनिर्माणमंत्री अतुल सावे यांची माहिती

। मुंबई । वृत्तसंस्था ।

विक्रीअभावी पडून असलेल्या म्हाडाच्या घरांच्या किंमती कमी होणार असल्याची माहिती गृहनिर्माणमंत्री अतुल सावे यांनी दिली. घरांच्या किमतींचा आढावा घेऊन निर्णय घेणार असल्याचेही सावे यांनी स्पष्ट केले.

म्हाडाच्या जवळपास ११ हजार घरांच्या किंमती कमी होणार आहेत. संबंधित घरांचे वीजबिल, पाणीपट्टी भरावी लागत असल्याने म्हाडाच्या वतीने हा निर्णय घेण्यात आल्याचे सावे यांनी सांगितले. अशा जवळपास ११ हजार घरांची किमती कमी करुन पुन्हा विक्री करण्यात येणार आहे.

दरम्यान, पुणे गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरण अर्थात म्हाडाच्या पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर, सांगली येथील सदनिकांची सोडत पुन्हा एकदा पुढे ढकलली आहे. विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत सुमारे ५ हजार ८६३ सदनिकांची सोडत शुक्रवारी (दि. २४) होणारी होती. ही सोडत प्रशासकीय कारणांमुळे पुढे ढकलण्यात आली असून, लवकरच अर्जदारांना त्याबाबत कळविण्यात येणार आहे.

झुंझार मंडळातर्फे अभिनव उपक्रम ; कै. मिलिंद चवरकर स्मृती चषक

'मिक्स' क्रिकेट स्पर्धेमध्ये मुलींचा दबदबा

। रायगड । प्रतिनिधी ।

आज महिला सर्व क्षेत्रांमध्ये पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून वावरत आहेत. मात्र अजूनही खेळांमध्ये पुरुष व महिला यांच्या स्पर्धा स्वतंत्रपणेच भरवल्या जातात. टेनिस व बॅडमिंटनमध्ये मिक्स डबल्सचे सामने खेळवले जातात. मात्र क्रिकेट , फुटबॉल इत्यादींमध्ये पुरुष व महिलांचे एकत्रित संघ खेळण्याची कल्पना पुढे आलेली नाही. पोयनाडच्या झुंझार युवक मंडळाने मात्र ही कामगिरी करून दाखवली आहे. गेली तीन वर्षे ते मुले-मुलींच्या एकत्रित संघांचे सामने अत्यंत यशस्वीपणे भरवत आहेत.

विशेष म्हणजे या स्पर्धांमध्ये मुलांच्या तुलनेत मुलींची कामगिरी उल्लेखनीय आहे. ➤ पान २ वर

"जिल्ह्यातील युवा मुलामुलींमधून क्रिकेटपटू घडवण्यासाठी झुंझार युवक मंडळ पोयनाड प्रयत्नशील आहे. विशेष म्हणजे यंदाच्या मुलामुलींच्या एकत्रित संघातील मुलींची कामगिरी वाखाणण्याजोगी आहे. तंत्रशुद्ध फलंदाजी , उत्कृष्ट गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण डोळ्याची पारणे फेडणारे आहे. मुलांच्या शैलीपेक्षा मुलींच्या खेळण्याची शैली उत्कृष्ट आहे. अद्याप या स्पर्धेतील केवळ तीन सामने झाले आहेत. अजून २० सामने होणार आहेत. यामुळे मुलींची क्रिकेट खेळातील रणनीती प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

– अन्वर बुराण,
अध्यक्ष, झुंझार युवक मंडळ

"झुंझार युवक मंडळाने गेल्या दोन वर्षात मिक्स क्रिकेटच्या चार स्पर्धा भरवल्या. स्पर्धेतून अनेक मुलींना जिल्हा आणि राज्य स्तरीय क्रिकेट खेळण्याची संधी मिळाली आहे. यामुळे क्रिकेटला आपले विश्व बनविणाऱ्या मुलींना प्रोत्साहन मिळाले. यामुळे उत्कृष्ट क्रिकेट खेळणाऱ्या मुलींना भविष्यात देशासाठी क्रिकेट खेळण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या संघांमध्ये मुलींची संख्या उल्लेखनीय आहे. त्यांचा खेळदेखील तितकाच अप्रतिम आहे.

– रोशनी पारधी
एसबीसी क्रिकेट अकॅडमी महाड

शिंदे सरकारमध्ये बेबनाव?

जालना पोलिस अधिक्षकांची पुण्यात नियुक्ती

। मुंबई । वृत्तसंस्था ।

जालन्यातील अंतरवाली सराटीत मराठा आंदोलकांवर पोलिसांकडून झालेल्या अमानुष लाठीमार प्रकरणात अजून आदेश कोणी दिला याचाच थांगपत्ता लागलेला नाही. असे असताना तत्कालिन पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांची बदली पुण्याच्या गुन्हे अन्वेषण अधीक्षकपदी करण्यात आली आहे. त्यामुळे दोशी यांना शिक्षा झाली, की गृहखात्याने बढती दिली, असा हल्लाबोल विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. दुसरीकडे, मंत्री दीपक केसरकर यांनी तुषार दोशी यांच्या बदलीला स्थगिती देण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र

लिहून केली आहे. त्यामुळे तुषार दोशींच्या बदलीवरून सरकारम धील बेबनाव समोर आला आहे.

अंतरवाली सराटी येथील वयोवृद्ध नागरिक, महिलांसह निर्दोष आंदोलकांवर अमानुष लाठीमार झाला. त्या पोलिसी अत्याचारासाठी स्वतः गृहमंत्र्यांवर राज्याची माफी मागण्याची नाम ुष्की ओढवली. लाठीमारानंतर जालनाचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांच्यावर कठोर कारवाईची अपेक्षा होती. मात्र त्या ऐवजी त्यांना पुण्यात 'क्रिम पोस्ट'वर बदली मिळाली. याबाबत केसरकर यांनी मुख्यमंत्र्याना पत्र लिहून दोशी यांच्या बदलीला स्थगिती देण्याची मागणी केली आहे.

विशेष म्हणजे राज्य सरकारच्या कामकाजाबाबतची माहिती पत्रांवर पत्रे लिहिल्यानंतरही मिळत नाही. मात्र केसरकरांचे हे पत्र लगेच सार्वजनिक होते. हा सारा प्रकार म्हणजे एकाने मारल्यासारखे करायचे आणि दुसऱ्याने रडल्यासारखे करायचे, असाच आहे. महायुतीचे सरकार हे जनतेला मूर्ख बनवू पाहणारे हेराफेरी सरकार आहे, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२५ नोव्हेंबर

१) श्री. भालचंद्र लक्ष्मण पिंगळे
चेंढरे, अलिबाग, २५-११-१९५७

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

स्व. श्रीमती सुशीला दामोदर जाधव, स्मरणार्थ अलिबाग

दिव्यांगांचा ग्रामपंचायतीवर मोर्चा

पाच टक्के थकीत अनुदानाची मागणी

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायतीत दिव्यांगांना ग्रामपंचायतीच्या एकूण महसुलातील पाच टक्के निधी मिळावा यासाठी ग्रामपंचायत कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. आझाद समाज पक्ष आणि आधार अंध- अपंग संस्था यांच्या माध्यमातून हा मोर्चा काढण्यात आला.
ग्रामपंचायतीत १३० दिव्यांगांची नोंद आहे.

ग्रामपंचायत हद्दीत राहणाऱ्या दिव्यांगांना ग्रामपंचायतीच्या एकूण महसूला पैकी पाच टक्के रक्कम दिव्यागं निधी म्हणून देणे अपेक्षित आहे. नेरळ ग्रामपंचायतीमध्ये नोंद असलेल्या १३० दिव्यागांना मागील तीन वर्षापासून त्यांचे हक्काचे अनुदान मिळाले नाही असा आधार अंध-अपंग संघटनेचा दावा आहे. यासाठी आधार संस्थेला नेरळमधील आझाद समाज पक्ष त्यांच्या हक्काचे अनुदान मिळण्यासाठी मदत करीत होते. हे अनुदान देण्यात यावे यासाठी दिव्यांगांनी नेरळ ग्रामपंचायतकडे पाठपुरावा केला होता.

तरी देखील पाच टक्के अनुदानाचे वितरण केले जात नव्हते. त्यासाठी आझाद समाज पक्षाने मोर्चा काढण्याचा इशारा दिला होता. तरीदेखील कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने नेरळ गावातील सर्व दिव्यांग रस्त्यावर उतरले.

नेरळ रेल्वे स्टेशन येथून निघालेला मोर्चा माथेरान रस्त्याने लोकमान्य टिळक चौकातून नेरळ ग्रामपंचायतीवर पोहचला.

मोर्चामध्ये चालता येत नसलेल्या दिव्यांगांनी ट्राय सायकल वर बसून मोर्चात सहभाग नोंदवला.

सरपंच उषा पारधी यांच्या कार्यालयात मोर्चेकऱ्यांच्या वतीने आझाद समाज पक्षाचे ॲड. सुमित साबळे, सिद्धार्थ सदावर्ते,आधार अपंग संघटनेचे अरुण जोशी, रवींद्र वझरकर, सुनील राजे, इब्राहिम शेख, किशोर कर्वे, विकास कुलकर्णी यांनी चर्चा केली.

यावेळी ग्रामपंचायतीमध्ये नोंद असलेल्या १३० दिव्यांगांना १५ डिसेंबरपर्यंत थकित अनुदानापैकी ६००० चे अनुदान दिले जाईल. तसेच उर्वरित अनुदान मार्च २०२४ पूर्वी वितरित करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले.

करात सुट

अंध अपंग या दिव्यांग व्यक्ती यांना त्यांच्या घरपट्टी, पाणी पट्टी या कारमध्ये ५०टक्के सवलत असल्याची माहिती मोर्चेकरी यांना ग्रामपंचायतीकडून देण्यात आली.

एमआयडीसीत कचऱ्याची समस्या

। पनवेल । वार्ताहर ।

तळोजा औद्योगिकवसाहतीमध्ये साफसफाई व कचरा वाहतुकीसाठी महानगरपालिकेने पुरेशी व्यवस्था केलेली नाही. यामुळे अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसत आहेत. कचरा वाहतुकीसाठी मनुष्यबळही अपुरे असल्यामुळे ही समस्या निर्माण झाली आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी महानगरपालिकेने पुरेशी तरतूद करावी अशी मागणी उद्योजक संघटनेने केली आहे.

पालिका कार्यक्षेत्रामध्ये ८७६ हेक्टर जमिनीवर तळोजा एमआयडीसी उभारण्यात आली आहे. १६२२ औद्योगिक भूखंड आहेत. एमआयडीसीमध्ये ४२.१८ किलोमीटरलांबीचे रस्ते असून, त्यामध्ये २२.५४ किलोमीटर लांबीचे रस्ते काँक्रीटचे आहेत. १९.६४ किलोमीटर लांबीचे रस्ते डांबरीकरणाचे आहेत. मनुष्यबळ वाढवा साफसफाईसाठी अपुरे मनुष्यबळ व कचरा वाहतुकीसाठी पुरेशी वाहने नसल्यामुळे कचऱ्याची समस्या गंभीर होत चालली आहे. वेळेवर कचरा उचलला जात नाही. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याचीही भीती टीबीआयने व्यक्त केली आहे.

जबाबदारी कोणाची

एमआयडीसीमधील स्वच्छतेची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. मनपाकडून पुरेशी व्यवस्था केली जात नसल्याचे तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशन अर्थात टीबीआयने निदर्शनास आणून दिले आहे. संघटनेचे अध्यक्ष सतीश शेट्टी व इतर सदस्यांनी या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

मुरुड पंचक्रोशीत मळणी सुरु

। आगरदांडा । प्रतिनिधी।

मुरुड पंचक्रोशी भागात भात कापणी पूर्ण झाली आहे. आता मळणीली सुरुवात झाली आहे. चार महिन्याच्या परिश्रमानंतर बळीराजाला सोनेरी दाणा पहावयास मिळात आहे. तालुक्यात ३९०० हेक्टर क्षेत्रात भातपीकाची लागवड केली होती. त्यापैकी ३३०० हेक्टर क्षेत्रात सुवर्णा, रूपाली, कर्जत, साई, जया, व इतर भात पीकाची लागवड केली होती. परितीच्या पावसात थोडफार नुकसान झाले असले तरी शेतकरी सुखावलेला पहावयास मिळत आहे. शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज घेत भात कापणी पूर्ण करुन तालुक्यात मळणीला सुरुवात केली आहे.

महिलांसाठी योगा प्रशिक्षण

। रसायनी । वार्ताहर।

रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी परिसरातील कराडे खुर्द ग्रामपंचायत हद्दीतील सर्व महिलांना योगा, प्राणायाम, ध्यानधारणा प्रशिक्षण मिळावे यासाठी मिनल ठोंबरे यांनी गुरुवार दि.२३ नोव्हेंबर रोजी योगा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन ग्रामपंचायत सभागृहात करण्यात आले होते. यावेळी भारती चितळे व मिनल ठोंबरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. ऐश्वर्या समेल यांनी महिलांना योगा प्रशिक्षणाची माहिती देवून योगाचे महत्त्व विशद केले. यानंतर प्रशिक्षण शिबिराला सुरुवात करण्यात आली. यावेळी यावेळी किरण माळी, भारती चितळे, रविंद्र चितळे, भानूदास माळी, सुजाता माळी, मुकेश पाटील, धनाजी ठोंबरे, राजू चितळे, प्रशांत चितळे, योगेश मुरकुटे आदीसह ग्रामपंचायत आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

घरांमधील नळांची चोरी

। पनवेल । वार्ताहर।

नव्याने बांधण्यात आलेल्या बंद ४१ घरांमधील नळांची चोरी झाल्याची घटना पनवेलमध्ये घडली आहे. पनवेल तालुक्यातील मोरबे गावात असलेल्या सहकार द्वारका रहिवासी संकुलात घडली. मोरबे गावात सहकार द्वारका रहिवासी संकुलात १२ इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

तीन इमारतींचे बांधकाम सुरु आहे. सोसायटीत पाणी नियोजनाचे काम पाहणारे तुकाराम गायकर पाण्याचे टॅप सुरू करण्यासाठी जात असताना बंद असलेले फ्लॅटचे कुलूप तोडण्यात आल्याचे दिसले. त्यांनी फ्लॅटमंध्ये पाहिले असता बाथरूम, टॉयलेट, किचन, बेसिन आदींमध्ये नळ नसल्याचे लक्षात आले. त्यामुले ४१ फ्लॅटमधील ४२ हजार ३५० रुपयांचे नळ चोरीस गेल्याची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

गवळवाडीत एकादशी साजरी

। म्हसळा । वार्ताहर ।

म्हसळा तालुक्यातील गवळवाडी येथे श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात प्रबोधिनी कार्तिकी एकादशी उत्सव उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. पुरोहित सुधाकर जंगम यांच्या मंत्रोपचारात अंकुश नटे आणि अनुष्का नटे यांच्या हस्ते सपत्नीक पूजा करण्यात आली. सकाळच्या सत्रात अभिषेक, पूजापाठ, आरती, सोहळा आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील हजारो भाविक भक्तांनी श्री विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेतले.

कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी ग्रामस्थ व महीला मंडळाने सहभाग घेतला होता.

कायमस्वरूपी तलाठ्याची मागणी

। रसायनी । वार्ताहर ।

वासांबे मोहोपाडा विभागासाठी स्वतंत्र मंडळ विभाग झालेला आहे. सदर विभागामध्ये वासांबे रिस सजा आहेत.

लोक संख्येच्या दृष्टीने वासांबे मोहोपाडा व रिस सजाची लोक संख्या जास्त असून तेथील ग्रामस्थ, शेतकरी जास्त प्रमाणात आहेत.

रिस व वासांबे सजातील ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी, अपंग यांना शासकीय कामासाठी १५ किलोमीटर लोहोप येथे जावे लागते. वासांबे मोहोपाडा व रिस सजातील ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी, अपंग यांच्या कामाचा भार जास्त असल्याने मंडळ अधिकारी यांची रिस तलाठी अथवा मोहोपाडा तलाठी कार्यालयात बसण्याची विनंती माजी सरपंच कृष्णा पारंगे यांनी खालापुर तहसिलदार आयुब तांबोळी यांच्याकडे केली आहे.

रिस येथील लोकसंख्या व कामाचा व्याप पाहता रिस येथे कायम स्वरूपी तलाठी नेमणूक करण्याचीही मागणी पारंगे यांनी केली आहे.

यावेळी प्रकाश पाटील, अनंता दळवी, राम कुरंगले तसेच परिसरातील अनेक शेतकरी, सरपंच. उपसरपंच, ग्रमस्थ विद्यार्थी या प्रसंगी मोठ्या प्रमाणात मोठ्या संख्येने उपस्थित होते.

करंजाडेत चोरी

। पनवेल । वार्ताहर ।

चोरट्याने घरात प्रवेश करून दोन मोबाईल व रोख रक्कम असा ४० हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिश सोनकर हे गणेशनगर, करंजाडे येथे राहतात. सकाळी उठल्यानंतर त्यांनी मोबाईल पाहिला असता मिळून आला नाही. यावेळी चुलत भावाचा मोबाईलही हरवल्याचे समोर आले. त्यांनी घराची पूर्ण पाहणी केली असता कपडे जमिनीवर अस्ताव्यस्त पसरलेले दिसून आले. तसेच रोख रक्कमही लंपास केल्याचे आढळून आले.

करंजाडेत पाणी टंचाई

रहिवाशांचा सिडकोवर कार्यालय धडक

। पनवेल । वार्ताहर ।

करंजाडे वसाहतीमध्ये अनेक महिन्यांपासून तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. या ठिकाणी गरजेपुरते सुद्धा पाणी मिळत नाही. त्यामुळे संतप्त रहिवाशाने थेट सिडको कार्यालय गाठले. हातोड्याने गेटचे टाळा तोडून आंदोलकांनी आत प्रवेश केला. सिडको अधिकाऱ्यांना लवकरात लवकर पाणीपुरवठा सुरळीत करण्याची आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

करंजाडे वसाहतीला न्हावा- शेवा पाणीपुरवठा योजनेतून पाणी दिले जाते. जेएनपीटीकडे जाणाऱ्या वाहिनीमधून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वसाहतीला पाणीपुरवठा केला जातो. जलवाहिन्या बदलण्याचे काम सुरू असल्यामुळे पनवेल शहर, सिडको वसाहती, करंजाडे कॉलनीला सुद्धा मागणीप्रमाणे पाणीपुरवठा केला जात नाही.

एमजेपीच्या वाहिन्यांना फुटीचे ग्रहण लागल्याने ही परिस्थिती निर्माण होत आहे. करंजाडे कॉलनी पूर्णपणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर अवलंबून आहे. या यंत्रणेतून पाणीपुरवठा न झाल्यास वसाहतीला पाणी मिळत नाही. त्यामुळे या परिसराला बारमाही पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

या भागात बूस्टर पंप बसवण्यात आले असले तरी टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण होत आहे. रहिवाशांनी वारंवार आंदोलन करूनही सिडकोला पाणीपुरवठा सुरळीत करता येत नाही.

महामार्ग रोखणार

करंजाडे येथील पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. येत्या आठ दिवसात पाणी सुरळीत सुरू झाले नाही तर विमानतळ रोड व जेएनपीटी महामार्ग बंद करण्याचा इशारा करंजाडेकरांनी दिला आहे.

खोपोली नगरपरिषदतर्फे स्वच्छता मोहीम

। खोपोली । वार्ताहर ।

खोपोली शहरामध्ये फक्त सुशोभिकरण नव्हे तर शहरामध्ये सातत्याने स्वच्छता असणे आवश्यक आहे. त्याच माध्यमातुन स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व नगरपालिकांना दिलेले आहेत. त्याअनुषंगाने २४ नोव्हेंबर रोजी स्वच्छता अभियान खोपोली शहरात अग्निशमन कार्यालय, खालची खोपोली ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात स्वच्छता मोहीम राबविणेत आली. या अभियानात खोपोली नगरपालिकेनी देखील आपला सहभाग नोंदवुन मुख्याधिकारी अनुप दुरे यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली शहर स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न केला. यावेळी अग्निशमन कार्यालय, खालची खोपोली ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक पर्यंतचा रस्त्यावरील कचरा उचलण्यात आला. यावेळी रस्त्याच्या बाजुला पडलेली झाडे, गटारात पडलेला कचरा, बाटल्या काढुन गटारे साफ करण्यात आली. रस्त्याच्या दुतर्फा असलेले अतिक्रमण, बॅनर, रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात आले. एकूण चार ते पाच टन कचरा १५० कर्मचारी वर्ग व सामाजिक संस्था, नागरीक यांच्या सहाय्याने उचलुन शहर स्वच्छ करण्यात आले. या स्वच्छता अभियानात मुख्याधिकारी अनुप दुरे, उपमुख्याधिकारी गौतम भगळे, अनिल वाणी, युवराज विरणक, प्रविण भोई, भक्ती साठीलकर आदी सहभागी झाले होते.

श्री भैरव विठ्ठल रुक्मिणी मंदिरात भाविकांची गर्दी

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड शहरातील श्री भैरव विठ्ठल रुक्मिणी मंदिरात कार्तिकी एकादशीनिमित्त विठ्ठल भक्तांनी मंदिरात विठूरायाच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. गुरुवारी पहाटे विठ्ठल रुक्मिणी मातेच्या पूजा करण्यात आली. या पूजेचा मान जूनी पेठ येथील रुपेश दिलीप जामकर व त्याच्या पत्नी प्रतिक्षा जामकर यांना मिळाला. पंचक्रोशीत एकमेव मंदिर असल्यामुळे विठ्ठलाच्या ओढीने टाळ-मृदंगाच्या तालावर विठुरायाचा जयघोष करत मंदिरात भक्तीमय वातावरण पसरलेले पाहायला मिळाले.

पान १ वरून

विरोध फसवाफसवीला

प्रकल्प निर्माण करावा ही या शेतकऱ्यांची भावना आहे. जर शेतकऱ्यांना विश्वासात घेतले नाही, तर या ठिकाणी हक्क गाजवू देणार नाही. पेझारी दिवलांग येथील सदानंद दामोदर पाटील हे शेतकरी म्हणाले की, ४१ गुंठा जमीन शहापूरमध्ये आहे. त्यातील २१ गुंठे जमीन गेल कंपनीकडून जेएसडब्लू कंपनीने गॅस लाईनसाठी संपादित केली आहे. त्याचा अद्यापर्यंत मोबदला देण्यात आला नाही. शेतकरी अजूनही उपेक्षित आहे. शहापूर येणाऱ्या प्रकल्पाला विरोध नाही, मात्र जमिनीला योग्य बाजारभाव मिळाला पाहिजे.अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांसोबत चर्चा करावी. योग्य ती अंमलबजावणी करावी. शेतकऱ्यांना विचारात घेऊन या ठिकाणी कामे करावीत, नोकरीची हमी द्या, रुग्णालय, शिक्षणाच्या सुविधा या ठिकाणी द्या, शेतकरी व गावाचे नुकसान होणार नाही असे प्रकल्प आणा, अशा आमच्या मागण्या आहेत.

तुळजाभवानी देवीचे दागिने वितळविणार

तुळजाभवानी देवीच्या अंगावरील पुरातन दागदागिने, असे दोन स्वतंत्र खजिने मंदिरात आहेत. त्यापैकी भाविकांनी अर्पण केलेल्या सोन्या-चांदीच्या मौल्यवान वस्तू वितळवून एकत्र करून बँकेत ठेवण्याबाबतचा ठराव तुळजाभवानी मंदिर समितीने जुलै २०२३ आणि ऑगस्ट २०२३ रोजी घेतला होता. त्यानुसार मंदिर समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी शासनाने रितसर परवानगी मागीतली होती. शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या साईबाबा संस्थान आणि सिध्दीविनायक गणपती मंदिर यांच्याप्रमाणे विहित प्रक्रिया राबवून सोन्या-चांदीची दागिने वितळविण्यास काही अटी आणि शर्ती घालून शासन मान्यता देण्यात आली.

'मिक्स' क्रिकेट स्पर्धेमध्ये मुलींचा दबदबा

मुलींच्या 'झुंझार' खेळीमुळे संघाला विजय मिळविणे शक्य झाल्याचे चित्र या स्पर्धेमध्ये आहे. यंदादेखील लेदरबॉल स्पर्धेत महिलांचा दबदबा पहावयास मिळाला. मुलींनी फलंदाजी , गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात केलेल्या अष्टपैलू कामगिरीमुळे क्रिकेट निवड समितीचे लक्ष वेधून घेतले आहे.झुंझार युवक मंडळ पोयनाड यांनी कै. मिलिंद रविंद्र चवरकर स्मृतीचषक कनिष्ठ वयोगटातील एकदिवसीय ४० षटकांची लेदर बॉल क्रिकेट स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेमध्ये रायगड जिल्ह्यातील एकूण १२ संघांनी सहभाग घेतला आहे. स्पर्धेत सहभागी झालेल्या संघात मुलांच्या बरोबर मुलींना सुद्धा खेळण्यास संधी उपलब्ध करून दिली आहे. यामुळे प्रत्येक संघात किमान ५ मुलींचा सहभाग आहे. झुंझारच्या मैदानावर मुलींनी आपल्या अष्टपैलू खेळीने आपापल्या संघाला विजय मिळवून दिला आहे. मुले आणि मुलींच्या एकत्रित संघांच्या स्पर्धेमुळे मुलींना आपली उत्कृष्ट खेळी करता येते. यामुळे यापूवी झालेल्या स्पर्धांमधून रायगड जिल्ह्यातील क्रिकेट खेळणाऱ्या मुलींना संधी मिळाली. या मैदानावर आपल्या खेळाचे प्रदर्शन करणाऱ्या रायगड जिल्ह्याच्या समृद्धी कांबळे, रोशनी पारधी, आर्या गडदे आणि समिधा तांडेल यांची महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे. अन्य संघातील २० मुलींचे रायगड जिल्ह्याच्या संघात निवड करण्यात आली आहे.

लेदरबॉल स्पर्धेतील आतापर्यंत झालेल्या सामन्यांमध्ये खोपोलीच्या स्तुती विठलानीने एका सामन्यात प्रतिस्पर्धी संघाचा अर्धा संघ आपल्या फिरकीने तंबूत पाठवून संघाला विजय मिळवून दिला आहे. तिला साम नावीराचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे अलिबागची तनिष्का वारगे (फलंदाज) ,खोपोलीच्या वैभवी कुलकर्णी आणि गीतांजली शर्मा (गोलंदाज) , निशा विठलानी , वेदांगी धनानी , खारघरची देविका रामप्रसाद , पनवेलची स्वरा जगताप , खोपोलीच्या श्रेया पडळकर , अन्वेषा हंबे (अष्टपैलू) या मुलींनी झालेल्या सामन्यांमध्ये आपल्या खेळीने मैदानावर आपले वर्चस्व कायम ठेवले होते. यामुळे या मुलींना उदयोन्मुख खेळाडू म्हणून गौरविण्यात आले आहे. अजून या स्पर्धेतील २० सामने शिल्लक आहेत. यामुळे जिल्ह्यातील मुलींची शैलीदार खेळी झुंझारच्या मैदानावर पहावयास मिळणार आहे.

सुनावणी तहकुबीस न्यायालयाचा नकार

असल्याचे विशेष न्यायाधीश राहुल रोकडे यांनी सांगितले. मात्र, अनेक खटल्यांमध्ये लोकप्रतिनिधींकडून वारंवार सुनावणी तहकुब करण्याची विनंती येते, परंतु यापुढे असे घडणार नाही, अपरिहार्य कारणास्तव सुनावणी तहकूब केली जाणार नाही, अशी स्पष्ट तंबी मुंबई सत्र न्यायालयाने दिली.

दरम्यान, आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींन्वये दाखल झालेल्या गुन्ह्यात पंकज व समीर भुजबळ यांनी मनी लाँड्रिंगचा खटला रद्द करण्याची विनंती करीत विशेष पीएमएलए न्यायालयात अर्ज केला आहे. त्यांच्यापाठोपाठ संजय जोशी, तन्वीर शेख, सत्येन केसरकर व राजेश धारप या चार आरोपींनी सुद्धा अर्ज केले आहेत. मात्र, भुजबळ बंधूसह सर्व आरोपींचे अर्ज न्यायालयाने नाकारले आहेत.

जिल्हा न्यायालयातही 'व्हिडिओ कॉन्फरन्सिंग'

ई-कोर्ट प्रकल्पाच्या अंतर्गत मुंबई उच्च न्यायालयाने राज्यातील जिल्हा न्यायालयांमध्ये व्हिडिओ कॉन्फरन्सिंगची सुविधा देण्यासाठी राज्य शासनाला प्रस्ताव सादर केला होता. विधी आणि न्याय विभागाच्या २० ऑक्टोबरला झालेल्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी प्रदान करण्यात आली. राज्य शासनाच्यावतीने एक कोटी दोन लाख ६६ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

जेवण उशिरा दिल्याने चॉपरने हल्ला

रात्री ११ च्या सुमारास ओंकार भोसले आणि अभी पाटील हे दोघे आले होते. ते टेरेसवर बसले होते. तेथे त्यांचा आणखी एक मित्र आला. त्यांनी जेवणाची ऑर्डर दिली होती, मात्र ती आणण्यास उशीर झाल्याने तिघांनी जोरजोरात टेबल वाजवण्यास सुरुवात केली. तसेच वेटरला शिवीगाळ करू लागले. तक्रारदार शेट्टी यांनी त्यांना टेबल वाजवण्यास मनाई केली.त्याचा राग आल्याने अभी पाटील याने टेबल उलटे केले. त्यानंतर शेट्टी यांनी तिघांना वेटरच्या मदतीने खाली आणून हॉटेलबाहेर जाण्यास सांगितल्यानंतर ते निघून गेले. भोसले हा बाजूच्या चायनीज दुकानात गेला. तेथून तो चॉपर घेऊन आला आणि पुन्हा हॉटेलमध्ये घुसला.त्याला अडवण्याचा प्रयत्न करणारा हॉटेलचा भागीदार नीलेश अण्णा आणि वेटर यांच्यावर चॉपरने वार करून हॉटेलचा बोर्ड तोडला. हॉटेलमालकाने पोलिस नियंत्रण कक्षाला फोन करून याबाबत कळवले. त्यानंतर तिघेही तेथून मोटरसायकलवरून पसार झाले.

पाहिजेत

सुधागड तालुका फार्मर्स प्रोड्युसर ऑर्गनायझेशन लि. करीता खालील रिक्त पदांची भरती आहे.

पद : मुख्य कार्यकारी अधिकारी (C.E.O.)

शैक्षणिक पात्रता व अनुभव : B.Sc. Agriculture किंवा B.com.संगणक हाताळणे आवश्यक, टॅली, मराठी व इंग्लिश टायपिंग आवश्यक. सहकार किंवा पणन (Marketing) क्षेत्रात दोन वर्षे कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य

अर्ज -sudhagadfarmer01@gmail.com या Email ID वर पाठवावे.

संपर्क- ८०८७८६२३८५

चेअरमन
सुधागड ता. फार्मर्स प्रोड्युसर लि. पेडली
ता. सुधागड, जि. रायगड

महिलांची दिघी पोर्टला धडक

मासळी बाजारासाठी दिघी पोर्टवर मोर्चा; बैठकीनंतरही प्रश्न अधांतरीच, आंदोलक नाराज

। दिघी । वार्ताहर ।
श्रीवर्धन तालुक्यातील दिघी येथील मासे विक्री करणाऱ्या महिलांना व्यवसाय करण्यास मासळी बाजाराची सुविधा नाही. सातत्याने मागणी होत असताना रस्त्यावर विक्री करत जीवघेणा संघर्ष करावा लागत आहे. या महिलांच्या हाकेला कुणीच प्रतिसाद देत नसल्याने अखेर गुरुवारी शेकडोंच्या संख्येने महिलांनी दिघी पोर्टवर मोर्चा काढला. त्यानंतर झालेल्या बैठकीत कोणताच तोडगा न निघाल्याने आंदोलकांनी नाराजी व्यक्त केली.

दिघी ग्रामपंचायतसमोरील सुचवलेल्या जागेत मासे विक्रीसाठी बाजार झाले पाहिजे. अशी आमची ठाम मागणी आहे. संपूर्ण दिघी पोर्ट समुद्रात उभे असून, सीआरझेडची परवानगी फक्त स्थानिकांवर लादण्यात येत आहे. हे अन्यायकारक आहे.

– किरण कांदेकर, दिघी कोळी समाज अध्यक्ष

दिघी भागातील नागरिकांचा मासेमारी हा प्रमुख व्यवसाय असला, तरी मासळी बाजारात पुरंशा सुविधा नाहीत. येथील 'आई एकविरा ओली सुकी मच्छीविक्रेता' ही महिलांची सामाजिक संस्था असून, या संस्थेतील दोनशेहून अधिक महिलांचा मासेमारी प्रमुख व्यवसाय आहे. या व्यवसायावर आपले कुटुंब चालविणाऱ्या महिलांना मासे विकण्यासाठी जागा उपलब्ध नाही.

या परिसराचा औद्योगिक क्षेत्र तसेच पर्यटनस्थळ म्हणून वाढता आवाका आहे. याठिकाणी सुसज्ज मासळी बाजाराची सुविधा मिळावी यासाठी स्थानिक संस्थेच्या हद्दीतील मेरिटाईम बोर्ड, दिघी पोर्ट, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या परवानगीने जागा उपलब्ध होण्यासाठी कागदोपत्रांची पूर्तता करण्यात आली आहे. मात्र सीआरझेडची परवानगी नसल्याचे कारण दिघी पोर्ट व्यवस्थापन पुढे करत आहे. स्थानिकांच्या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले.

दिघी कोळी बांधवांच्या मोर्चानंतर समन्वयाची बैठक घेण्यात आली. त्यामध्ये दिघी पोर्टचे अधिकारी उपस्थित होते. सीआरझेड परवानगीशिवाय समुद्रकिनारी बांधकाम करता येणार नाही. पर्यायी जागा सुचविल्यास निर्णय घेता येईल. सदर मागणीनुसार वरिष्ठांना कळविण्यात येईल. असे दिघी पोर्ट प्रशासनाकडून सांगण्यात आले.

मुरुड समुद्रकिनाऱ्याचे सुशोभीकरण अंतिम टप्प्यात

११ कोटी रुपये खर्चून बांधला जातोय संरक्षक बंधारा

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।
येथील समुद्रकिनाऱ्यावर संरक्षक बंधारा उभारण्यात येत आहे. या ठिकाणच्या सुशोभिकरणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. लवकरच हा बंधारा स्थानिकांसह पर्यटकांसाठी खुला करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी दिली.

कोकणाला ७२० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. कोकणातील समुद्र किनारे पर्यटन विकासांतर्गत विकसित करण्यासाठी सरकारने विशेष निधी दिला आहे. त्यानुसार मुरुडच्या संरक्षक बंधाऱ्यासाठी ११ कोटी ५० लाख रुपये खर्च केले जात आहेत.

संरक्षक भिंत उभारताना किनाऱ्यावर सुशोभीकरणासह पर्यटकांसाठी सोयी-सुविधा विकसीत करण्यात येत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने कपडे बदलण्याची खोली, गर्दीवर नजर ठेवण्यासाठी मनोरा, आकर्षक खाद्य दुकाने, पर्यटकांना बसण्यासाठी सर्वोत्तम आसन व्यवस्था करण्यात येणार आहे. समुद्र किनाऱ्यापासून फक्त दहा फुटांवर गाडी पार्क करुन समुद्र पर्यटनाचा आनंद लुटता येणार आहे. मोठ्या संख्येने पर्यटक आले, तरी मुख्य रस्त्यावर गर्दी होणार नाही, असे नियोजन करण्यात येत असल्याकडे भुसे यांनी लक्ष वेधले.

विकसित भारत संकल्प यात्रारथ तळा शहरात

। तळा । वार्ताहर ।
विकसीत भारत संकल्प यात्रारथाचे तळा तहसिल येथे तहसिलदार स्वाती पाटील आणि गटविकास अधिकारी कुलदीप बोंगे यांनी स्वागत केले.

भारत सरकारच्या योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचावेत याची खात्री करण्याच्या उद्देशाने विकसित भारत संकल्प यात्रा ही देशव्यापी मोहीम केंद्राकडून आखण्यात आली असून ही यात्रा २६ जानेवारी २०२४ पर्यंत सुरु राहणार आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने विकसित भारत संकल्प यात्रा योजनांच्या रथाचे शुक्रवारी २४ नोव्हेंबर रोजी तळा तहसिल आवारात तहसिलदार स्वाती पाटील गटविकास अधिकारी कुलदीप भोंगे यांनी स्वागत केले. यावेळी मंडळअधिकारी, तलाठी, महसूल कर्मचारी, पंचायच समिती कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संकल्प यात्रारथ तळा तालुक्यातील २५ ग्रामपंचायतींच्या परिसरात फिरणार आहे. विविध योजनांतर्गत पात्र असलेल्या परंतु आतापर्यंत लाभ न घेतलेल्या लोकांपर्यंत पोहोचणे, माहितीचा प्रसार आणि योजनांबद्दल जागरूकता निर्माण करणे, नागरिकांशी संवाद साधणे, यात्रेदरम्यान निश्चित केलेल्या तपशीलांद्वारे संभाव्य लाभार्थ्यांची नोंदणी करणे अशी विकसित भारत संकल्प यात्रेची मुख्य उद्दिष्टे आहेत.

आदिवासी कुटुंबाला परत मिळाली जमीन

। उरण । वार्ताहर ।
धामणी आणि धोधाणी येथील तीन आदिवासी कुटुंबांच्या तब्बल १७ एकर जमिनीवर धनदांडग्यांनी वीस वर्षांपासून अवैधरित्या कब्जा केला होता. प्रशासनाने याप्रकरणी पुढाकार घेत आदिवासी कुटुंबाना सदरची जमीन परत मिळवून दिल्याने त्यांनी प्रशासनाचे आभार मानले आहेत.

आदिवासी समाज अशिक्षित असल्याचा गैरफायदा घेवून त्यांच्याकडून अवधरित्या भाडेकरार, साठेकरार करून आदिवासींच्या जमिनीवर कब्जा केला होता. आदिवासी कुटुंबांनी अर्ज केल्यावर तहसीलदार पनवेल विजय पाटील यांनी संबंधित मंडळ अधिकारी अजित पवार आणि तलाठी श्रीनिवास मेटगी यांना स्थळपाहणी करण्याचे आदेश दिले. स्थळपाहणीमध्ये ही जमीन आदिवासींच्या नावावर असल्याचे दिसून आले. तहसीलदार पाटील यांनी अवैधरित्या कब्जा केलेल्या बिगर आदिवासी व्यक्तींना जमिनीचा ताबा सोडण्याचे आणि त्या जमिनी तातडीने आदिवासी कुटुंबाकडे परत करण्याचे आदेश दिले.

धामणी येथील एका कुटुंबाची १० एकर जमीन, दुसऱ्या कुटुंबाची ५ एकर आणि मौजे धोधणी येथे अन्य आदिवासी कुटुंबाची २ एकर जमीन आहे. सध्या या जमिनीला बाजारात कोट्यवधी रुपयांचा दर असल्याचे बोलले जाते.

प्रशासनाने ठामपणे आदिवासी बांधवांच्या पाठीशी राहून त्यांना त्यांच्या जमिनी परत मिळवून दिल्या आहेत. त्यामुळे प्रशासनाच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

बस थांबा शेड नसल्याने प्रवाशांचे हाल

। सुतारवाडी । वार्ताहर ।
सध्या मोठ्या प्रमाणावर उन्हाळा जाणवायला सुरुवात झाली आहे. गेल्या बारा वर्षापासून पनवेल ते इंदापूर रस्ता रुंदीकरण करण्याच्या नादात खांब, वाकण नाक्यावरील एसटी थांबा शेड गायब झाल्यामुळे उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत आहे.

पावसाळ्यात पावसापासून बचाव होण्यासाठी आजूबाजूच्या दुकानांमध्ये प्रवाशांना आश्रय घेऊन एसटीची प्रतीक्षा करावी लागत असे. एसटी आली की प्रवासी तिथपर्यंत पोहोचेपर्यंत एसटी तेथून निघून गेलेली असते. उन्हाळ्यात, तर प्रवाशांना उन्हापासून बचाव करण्यासाठी ताटकळत उभे राहावे लागत आहे. एक तर वाकण नाक्यावर तिन्ही बाजूंनी वाहने आली की मोठ्या प्रमाणावर धुरळा उडतो. नाका-तोंडात धुळीकण जात असल्यामुळे प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रतीक्षा करावी लागत आहे. महाडकडे जाण्यासाठी तसेच मुंबई, पाली, रोहाकडे जाण्यासाठी अनेक प्रवाशी भर उन्हात बसची प्रतीक्षा करत उभे असतात. गणपती सण आणि दिवाळी सणामध्ये सुध्दा अशीच परिस्थिती होती. रस्ता रुंदी करण्याचे काम पूर्ण कधी होणार हे अद्याप माहिती नाही, तोपर्यंत प्रवाशांना असाच त्रास सहन करावा लागणार आहे. प्रवाशांच्या सुरक्षतेसाठी तात्पुरती शेड उभारावी अशी मागणी होत आहे.

सरकारी भूखंड गिळंकृत करण्याचा डाव

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।



मुरुड तालुक्यातील नांदगाव ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीतील दांडेतर्फे नांदगाव येथील सुमारे अडीच एकर सरकारी भूखंडाची विक्री मुंबईतील एका धनिकास करण्यात आली आहे. आता त्या जमिनीवर तारेचे कुंपण घालण्याचा डाव नांदगावमधील एका राजकीय नेत्याने आखल्याची जोरदार चर्चा आहे.

सदर भूखंड नांदगाव ग्रामपंचायतीला डंपिंग ग्राऊंडसाठी मिळावा, अशी मागणी ग्रामपंचायतीने १८ डिसेंबर २०२० रोजी नांदगावच्या तलाठी तथा मंडळ अधिकार्यांकडे एका अर्जाव्दारे केली होती. त्यानुसार नांदगावच्या तत्कालीन मंडळ अधिकाऱ्यांनी १२ मे २०२२ रोजी मुरुडच्या तहसीलदारांना कळविले होते. मंडळ अधिकाऱ्यांनी त्यांचा अहवाल तहसील कार्यालयास सादर केला आहे. सहायक नगररचनाकार यांच्या कडील पत्रात मौजे दांडेतर्फे नांदगाव हे गाव मंजूर रायगड प्रादेशिक योजनेच्या नकाशानुसार शेती विभागात आणि वन विभागात समाविष्ट आहे. त्यामुळे ही जमीन वन विभागात समाविष्ट आहे किंवा कसे, याची स्पष्टता होत नाही. तसेच सीआरझेड नकाशा नुसार हा भाग सीआरझेड -१ व सीआरझेड - ३ मध्ये समाविष्ट आहे. सीआरझेड नियमानुसार सदर अधिसूचित क्षेत्रात डम्पिंग ग्राऊंड हा वापर प्रतिबंधित केलेला असल्याने सदर भूखंडाचा वापर मान्य होणार नाही. सदर जागा हस्तांतरित करणे शक्य नाही. त्यासाठी दुसऱ्या जागेचा विचार करावा, असे नांदगाव ग्रामपंचायतीला कळविण्यात आले आहे.

डम्पिंग ग्राऊंडसाठी जर सीआरझेड कायद्याचे बंधन असेल तर, सदर जागेच्या बाजूच्या अन्य जागांवर समुद्रालगत खारफूटी वनस्पतीची कत्तल करून समुद्रात घुसून अनधिकृत बांधकामांना कायदा शिथिल आहे का. अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर फिरवून शासकीय जागा घनिकाच्या घशात जाण्यापासून वाचवणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

'माणुसकी धर्म महत्वाचा'

। नेरळ । वार्ताहर ।
माणुसकीचा धर्म हा महत्वाचा आहे. त्यामुळे माणुसकीच्या नात्याने प्रत्येकाने माणुसकीची माळ जोडायला हवी असे प्रतिपादन शिवराम महाराज तुपे यांनी केले.

नेरळ येथील नेरळ वारकरी संप्रदाय मंडळातर्फे साडेतीन दिवसांच्या अखंड हरिनाम दीपोत्सव सोहळ्यात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. नेरळ येथील हनुमान मंदिरात मान्यवरांच्या हस्ते दीपोत्सव साजरा करण्यात आला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खोपोली येथील कीर्तनकार ज्ञानेश्वर महाराज शिंदे तसेच शिवराम महाराज तुपे, स्थानिक माजी सरपंच सावळाराम जाधव, नागो गवळी, भरत भगत, अंकुश

दाभने, उर्मिला हजार, तात्या पाटील, बंडू क्षीरसागर आदींसह मान्यवर उपस्थित होते.

पिंपळभाटमध्ये भटक्या श्वानांची दहशत

कुत्रा चावल्याने एक जखमी ; जिल्हा रुग्णालयात तातडीने उपचार

। अलिबाग । प्रतिनिधी ।
अलिबाग तालुक्यात भटक्या श्वानांची दहशत वाढल्याचे चित्र आहे. गेले काही दिवसांपासून कुत्रा चावण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. अलिबागनजीकच्या पिंपळभाट परिसरात भटक्या कुत्र्यांच्या टोळीतील एका कुत्र्याने रस्त्याने जाणाऱ्या सायकलस्वाराच्या पायावर झडप घेऊन तळव्याच्या खोटेला चावा घेतला. त्या सायकलस्वाराला तातडीने उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथे दाखल करण्यात आले .

अलिबाग शहरानजीकच्या चेंढरे ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या पाटीलवाडी येथे राहणारे सतीश जोशी हे पिंपळभाट येथून सायकलवरून आपल्या घरी निघाले होते. दुपारी दोन वाजता ते सुरुची हॉटेलसमोरून जात असताना रस्त्याच्या कडेला असणाऱ्या भटक्या कुत्र्यांच्या टोळीतील एका कुत्र्याने सतीश जोशी जात असलेल्या सायकलवर झडप घेतली. या झडपेमध्ये जोशी यांच्या पायाला कुत्र्याने चावा घेतला. त्यांच्या पायाच्या तळाव्याची खोट कुत्र्यांच्या जबड्यात सापडली. ते तातडीने खाली उतरले आणि त्यांनी जिल्हा रुग्णालयाकडे धाव घेतली. रुग्णालयाच्या अपघात कक्षात त्यांच्यावर उपचार करण्यात आले आहेत. असे सतीश जोशी यांनी सांगितले.

बोर्लीपंचतनमध्ये कार्तिकी एकादशीचा दिंडी सोहळा

। दिघी । वार्ताहर ।
बोर्लीपंचतन येथील कुंभार समाजाच्या वतीने कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने गुरुवारी दिंडी काढण्यात आली. दिंडीचे प्रस्थान विठ्ठल मंदिरातून झाले.

टाळ मृदुंगाच्या गजरात ग्यानबा तुकाराम आणि विठू नामाचा गजर करत गावात दिंडी फिरवण्यात आली. गेली कित्येक वर्ष ही परंपरा कायम आहे.

दरवर्षी या दिंडीचे आयोजन कुंभार समाज करत असतात. यामध्ये वारकरी तसेच डोक्यावर तुळस घेऊन महिलावर्ग आणि लहान मुले पताका

खांद्यावर घेऊन टाळ-मृदुंग विठ्ठलाच्या गजरात ही दिंडी फिरताना गावात भक्तीमय वातारण पाहायला मिळाले. या दिंडीमध्ये महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने विठुनामाने परिसर दुमदुमून गेला होता.

फळपीक विम्याचे पैसे दोन दिवसांत द्या

अन्यथा तीव्र आंदोलनाचा शेतकऱ्यांचा इशारा

। तळा । वार्ताहर ।
तालुक्यातील काही शेतकऱ्यांच्या बँक खात्यात दिवाळीनंतर फळपीक विम्याची काही रक्कम जमा झाली मात्र अजूनही तालुक्यातील शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळालेला नाही, दोन दिवसांत विम्याची रक्कम द्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन करु असा इशारा चंद्रकांत राऊत यांनी दिला आहे.

तळा तालुक्यातील शेतकऱ्यांनी राऊत यांच्या नेतृत्वात तळा तहसीलदार कार्यालयावर धडक दिली. या प्रश्नी तहसीलदार स्वाती पाटील यांना जाब विचारण्यात आला. तालुक्यातील शेतकऱ्यांच्या भावना व अडचणी पाटील यांच्या समोर मांडण्यात आल्या. पाटील यांनी जिल्हा कृषी अधिक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले यांना फोन केला. बाणखेले आणि शेतकरी यांचे संभाषण घडवून आणले. शेतकऱ्यांनी आपली व्यथा जिल्हा कृषी अधिकारी यांच्या समोर मांडली.

जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक झाली. त्यावेळी विमा कंपनीने दोन दिवसात उरलेले पैसे वितरीत करावेत, असे आदेश डॉ. म्हसे यांनी दिले आहेत. कंपनीने तसे न केल्यास कारवाई करण्याचे संकेतही दिल्याचे बाणखेले यांनी सांगितले.

हरिहरेश्वरमध्ये निर्माल्यातून दरवळला श्रद्धेचा सुगंध

सुवर्ण गणेश, सोमजाई मंदिरदेखील होणार उपक्रमात सहभागी

। दिघी । वार्ताहर ।
श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर तीर्थस्थळी भक्तिभावाने वाहिलेल्या निर्माल्यापासून अगरबत्ती तयार करण्याची अत्यंत अभिनव योजना हरिहरेश्वर विश्वस्तांनी सुरू केली आहे. या स्तुत्य उपक्रमात पुढाकार घेणारे कोकण किनारपट्टीवरील हे पहिलेच मंदिर असल्याचे बोलले जाते.

देशातील प्रमुख तीर्थक्षेत्र म्हणून दक्षिण काशी अशी ओळख असणाऱ्या हरिहरेश्वर येथे भाविकांची नेहमीच गर्दी पाहायला मिळते. येथे दर्शनाला आलेल्यांकडून देवाचरणी फुल, बेलपत्र वाहिले जातात. गेले कित्येक वर्षे मंदिरातील निर्माल्य समुद्रात विसर्जित करण्यात येते. आता मात्र भाविकांची वाढती गर्दी पाहता निर्माल्य जास्त प्रमाणात होत आहे. त्याचे विघटन कसे करावे याचा विचार करण्यात आला.

संस्थेचे सचिव सिद्धेश पोवार यांनी निर्माल्यापासून अगरबत्ती तयार

करण्याची कल्पना सुचवल्याने सर्वानुमते होकार मिळाला. निर्माल्यापासून अगरबत्ती बनविणारे पुणे येथील श्रीराम कुंठे यांची भेट घेण्यात आली. याकामी अध्यक्ष वामन बोडस व सचिव सिद्धेश पोवारसह सर्व विश्वस्तांनी पुढाकार घेऊन कुंठे यांच्या सहकार्याने मंदिरातील पवित्र निर्माल्यापासून बनवलेल्या अगरबत्तीचा बुधवारी शुभारंभ करण्यात आला.गावकऱ्यांनी देखील आपल्या घरातील पूजेचे निर्माल्य मंदिरात आणून द्यावे जेणे करून त्याचे योग्य प्रकारे विघटन होईल. तसेच सदर निर्माल्यापासून बनविण्यात आलेली अगरबत्ती मंदीराचे देणगी कक्ष कार्यालयात विक्री करिता उपलब्ध असून भाविकांनी तसेच ग्रामस्थांनी त्याचा लाभ नक्की घ्यावा, असे आवाहन मंदिर व्यवस्थापनाकडून करण्यात येत आहे.

विवाहित महिला बेपत्ता

शिहू : शेतजुई येथील विवाहित महिला मोनाली मंगेश पाटील (वय २६) या बेपत्ता झाल्या आहेत. मोनाली या मंगळवार २१ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेबारा वाजता शिहू एमआयडीसी येथील गॅस एजन्सीत कामावर गेल्या असता तेथून कोणालाही काहीही न सांगता निघून गेल्या. याबाबतची तक्रार तिचे पती मंगेश अनंत पाटील यांनी २२ नोव्हेंबर रोजी नागोठणे पोलिस ठाण्यात दिली आहे. अधिक तपास पोलिस हवालदार संदेश सानप करत आहेत.

पोलिसांना शिवीगाळ प्रकरणी; दोघांवर गुन्हा दाखल

रेवदंडा : पोलिस ठाण्यातील पोलिसांना शिवीगाळ, धक्काबुक्की आणि दमदाटी करण्यात आल्याची घटना घडली. या विरोधात रेवदंडा पोलिस ठाण्यात संबंधितावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उसर येथे २३ नोव्हेंबर रोजी सायकांळी साडेपाच वाजता, कंपनी गेटसमोर सोम प्रोजेक्ट कंपनीची वाहने अडवून भांडणे करत असल्याची माहिती पोलिसांना समजली. त्यावेळी रेवदंडा पोलिस ठाणे कर्मचारी एम.डी. ठाकूर यांनी उसर येथील संतोष नरेश पाडेकर यांस ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. ठाकूर यांना त्याने विरोध केला. पाडेकर यांनी ठाकूर यांचा शर्ट खेचून, बटन तोडले. तसेच गळा धरून शिवीगाळ, दमदाटी, मारहाण केली.

त्यानंतर पोलिसांच्या वाहनातून संतोष पाडेकर याला रेवदंडा पोलिस ठाण्यात नेत होते. त्यावेळी स्वप्नील पाडेकर यांनी आपली दुचाकी पोलिसांच्या वाहनाच्या आडवी घातली आणि शिवीगाळ, दमदाटी तसेच धक्काबुक्की करत सरकारी कामाच अडथळा आणला. रेवदंडा पोलिस ठण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एक छोटीशी विश्रांती

महाभारतात कौरव आणि पांडवांचे युध्द हे केवळ दिवसा चाले. सूर्यास्तानंतर ते थांबवले जाई. त्या युध्दाचेही काही नियम होते. ते अगदी धर्म आणि श्रीकृष्णाने देखील मोडले ही गोष्ट वेगळी. पण तेव्हा युद्ध हे शत्रूला संपवण्यासाठी खेळले जात होते. जिंकू किंवा मरू हा दोन्ही बाजूंचा नारा होता. आधुनिक काळात सर्व गोष्टी बदलल्या आहेत. तशीच युध्देही बदलली आहेत. त्यांचे नियमही बदलले आहेत. नागरी वस्त्यांवर हल्ले करायचा नाही हा संकेत आहे. पण तो पाळला जातो असे नाही. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे अमेरिकेने जपानमध्ये फोडलेले दोन अणुबाँब. हिरोशिमा आणि नागासकीमध्ये शत्रूची मुख्य लष्करी ताकद एकवटली आहे असे काही नव्हते. पण तरीही तेथे अपरिमित हानी घडवण्यात आली. आणखी एक नोंदण्यासारखी बाब म्हणजे, दुसरे महायुध्द सुरू केले जर्मनीने. आक्रमणे आणि नाश केला हिटलरने. पण सर्वाधिक शिक्षा दिली गेली ती जपानला. तेथपासून आजच्या पश्चिम आशियातील युध्दापर्यंत हेच चालू आहे. हमास या दहशतवादी संघटनेला धडा शिकवण्यासाठी इस्रायलने युध्द सुरू केले. आतापर्यंत गाझा पट्ट्यातील सत्तर टक्के इमारती बेचिराख करण्यात आल्या आहेत. पंधरा हजार निरपराध नागरिक मारले गेले आहेत. त्यानंतर आता या युध्दात शुक्रवारपासून चार दिवसांचा विराम घेतला जाणार आहे. हे आधुनिक काळाला साजेसे आहे. टीव्ही वाहिन्यांवर बातम्यांमध्ये किंवा मालिकांमध्ये दर आठ दहा मिनिटांनी छोटीशी विश्रांती उर्फ ब्रेक घेतला जातो. तसाच काहीसा हा प्रकार आहे. गंमत म्हणजे या विरामानंतर हमासला पूर्णपणे नष्ट केल्याखेरीज शांत बसणार नाही असा इशारा इस्रायलने आधीच देऊन ठेवला आहे. हमासच्या बाजूनेही हेच सांगितले जात आहे. कतार व इजिप्त या दोन देशांच्या मध्यस्थीने हा विराम घेतला गेला आहे. अमेरिकेनेही त्यासाठी बराच जोर लावला होता.

'हमास'ची भुयारे

सुमारे दीड महिन्यापूर्वी, सात ऑक्टोबरला हमासने इस्रायलवर जबरदस्त हल्ला केला व त्याचे शेकडो नागरिक ओलिस ठेवण्यासाठी पळवून आणले. इस्रायलची सरहद्द अनेक ठिकाणी बुलडोझर लावून उद्धवस्त केली गेली. नागरिक व सैनिक पूर्ण गाफील होते. त्यात किमान सातशे लोकांचा मृत्यू झाला. याचा बदला घेण्यासाठी इस्रायलने तात्काळ युध्द सुरू केले. सुरुवातीला अमेरिकेसह सर्व पाश्चात्य देश इस्रायलच्या बाजूने उभे राहिले. अमेरिकेने तर युध्दसामग्री आणि पैशांची मदतही पाठवली. शत्रुची तटबंदी भेदून कोठेही हल्ला करू शकणारे सैन्य अशी इस्रायलची आजवरची ओळख आहे. त्यामुळे हमासचे लवकरच कंबरडे मोडेल असे अनेकांना वाटत होते. पण प्रत्यक्षात ते झालेले नाही. गाझापट्टीमध्ये सुमारे तेवीस लाख पॅलेस्टिनी मुस्लिम राहतात. त्यांच्या डोक्यावरील छप्पर जवळपास गेले आहे. पण हमासच्या मुख्य केंद्राचा काही शोध लागलेला नाही. हमासचे काही दहशतवादी मारले गेल्याचे जाहीर झाले. पण हमासला किती धक्का बसला आहे हे कोणीच सांगू शकत नाही. गाझा शहराच्या खाली हमासने बरीच तळघरे व भुयारे खोदलेली आहेत असे म्हणतात. तिथे जाण्यासाठी ठिकठिकाणी मोठमोठे भुयारी रस्ते निर्माण केलेले आहेत. ती भुयारे आपण काही दिवसात उद्ध्वस्त करू असे इस्रायलला वाटते होते. पण मुळात या भुयारांचा अजून पक्का शोध लागलेला नाही. जेवढी कल्पना केली जाते तेवढ्या संख्येने ती आहेत का हे कोणीही सांगू शकत नाही. अलिकडेच अल शिफा या गाझातील सर्वात मोठ्या इस्पितळाला इस्रायली सैन्याने घेरले. या इस्पितळात हमासचा तळ असून तेथून दहशतवादी कारवाया चालतात असे इस्रायलचे म्हणणे आहे. इस्पितळाच्या खाली भुयारी मार्ग असल्याचे दाखवणारे काही व्हिडिओही त्याने प्रसारित केले आहेत. इस्पितळाच्या प्रमुखांना ताब्यात घेऊन इस्रायलने त्यांची चौकशी चालवली आहे. मात्र इतके करूनही हमासच्या कारवायांचा निर्णायक पुरावा त्याला देता आलेला नाही.

किंमत मोजावी लागेल

या काळात इस्पितळाची मात्र वाट लागली आहे. आधीच गाझाची पुरती दैना उडाली आहे. पिण्याचे पाणी नाही. अनेक ठिकाणी गटारातील पाणी पुन्हा वापरले जाते. खायला अन्न नाही. पेट्रोल वगैरे इंधन नाही. हजारो जखमी नागरिक उघड्यावर पडले आहेत. त्यांच्यासाठी पुरेशी औषधे तर सोडाच पण तपासायला डॉक्टर्सही शिल्लक नाहीत. तरीही हमासची नाकेबंदी करण्याच्या नावाखाली इस्रायलने सर्व नियमांचा भंग करून नागरी वस्ती व इस्पितळे यांच्यावर हल्ले केले आहेत. हे समोर आल्यानंतर आता पाश्चात्य देशांमधील इस्रायल-प्रेमाची लाट ओसरते आहे. अमेरिका, ब्रिटनसह अनेक देशांमध्ये पॅलेस्टिनींच्या समर्थनासाठी लाखो नागरिक रस्त्यावर उतरत आहेत. यामुळे तेथील सरकारांवर दबाव आला असून इस्रायलच्या सरकारला चाप लावणे त्यांना आवश्यक वाटू लागले आहे. आजपासून सुरू झालेला युध्दविराम हा त्या सर्वांचा परिपाक आहे. यामध्ये हमासतर्फे सुमारे चाळीस ओलिसांची सुटका केली जाईल. त्या बदल्यात इस्रायलच्या ताब्यातील दीडशे पॅलेस्टिनी कैदी सोडले जातील. म्हणजे हा मामला एकतर्फी नाही. एकूणच, या प्रकरणात हमासने इस्रायलची अचूक कोंडी केलेली दिसते. दरम्यानच्या युध्दात हजारो पॅलेस्टिनी मारले गेले आहेत व ही संख्या अजूनही वाढेल. मात्र तूर्त इस्रायलच्या एकतर्फी दादागिरीला हमासने शह आणि हादरा दिला आहे यात शंका नाही. हम तो डूबेंगेही सनम, तुम्हें भी ले डुबेंगे असा हा मासला आहे. हमासला संपवून आपण कायमची शांती घडवून आणू या इस्रायलच्या भ्रमाचा भोपळा यामुळे फुटेल. इस्रायलने गेली सत्तर वर्षे पॅलेस्टिनींना चिरडण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच हमासचा दहशतवाद निर्माण झाला. तो तसा होणे हे इस्रायलच्याही फायद्याचे ठरले. अमेरिकेकडून वाटेल तशी मदत मिळवता आली. पण हा भस्मासूर सहजी संपणारा नाही. छोटे-मोठे विराम घेत बराच काळ हे युध्द चालणार आहे. आजवर मोजली त्याहीपेक्षा कितीतरी अधिक किंमत इस्रायलला मोजावी लागणार आहे.

विचार

राजस्थानात सर्वच पक्षांत गटबाजी

राजस्थान निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात सर्वच पक्षांच्या नेत्यांनी प्रचाराचा धुरळा उडवला. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले; परंतु निवडणुकीत बंडखोरी, ओबीसी, जातनिहाय जनगणना, दोन्ही प्रमुख पक्षांमधील गटबाजी आणि दोन्ही प्रमुख पक्षांनी दिलेल्या लुभावणाऱ्या आश्वासनांचा मतदारांवर प्रभाव पडताना दिसला. त्या दृष्टीने पाहता ही निवडणूक विशेष गाजली. या निवडणुकीच्या प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात काय काय घडले?

शिवशरण यादव

राजस्थानमध्ये दर पाच वर्षांनी सत्तांतर होते. यावेळी भाजपची सत्तेत येण्याची वेळ आहे; परंतु केरळप्रमाणे राजस्थानमध्ये ही परंपरा खंडीत व्हावी, यासाठी काँग्रेसने पुरेपूर प्रयत्न केले आहेत. ओबीसी मतदारांचे वर्चस्व असलेल्या या राज्यात काँग्रेसने पाच वर्षानंतरही सत्तेत राहण्यासाठी समाजातील या वर्गाला आकर्षित करण्याची खेळी केली. पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी नुकतेच ओबीसी जनगणनेसाठी फासे फेकले. ते म्हणाले, देशात ओबीसी लोकसंख्या किती आहे हे कोणीही सांगू शकत नाही, कारण यामागे एक कारण आहे. तुम्हाला तुमची खरी लोकसंख्या कळू नये म्हणून रचलेले हे षडयंत्र आहे. बिहारमध्ये जात सर्वेक्षणाचा मुद्दा बऱ्याच दिवसांपासून चर्चेत आहे; पण राजस्थानमध्ये गेली पाच वर्षे सरकार असताना काँग्रेसने निवडणुकीदरम्यान हे आश्वासन दिले;

परंतु काँग्रेसच्या आश्वासनांचा ओबीसी मतदारांवर फारसा प्रभाव पडलेला नाही, असे अनेक सामान्य नागरिक म्हणतात. अशोक गेहलोत सरकार मोफत वीज देते, शाळांमध्ये मुलांना दुपारचे जेवण देते आणि वृद्धापकाळ पेन्शनही देते; मात्र, तरीही आपले मत भाजपला जाईल, असे राजकुमार खाटिक या मतदाराचे म्हणणे विचारात घेण्यासारखे आहे. दुसरीकडे जाटांची लोकसंख्या जास्त असताना त्यांचे प्रतिनिधी असलेल्या सतीश पुनियासारख्या नेत्याला भाजप प्रदेशाध्यक्षपदावरून हटवल्याबद्दल काहींनी उघड नाराजी व्यक्त केली. महिला कुस्तीपटूंच्या शोषणाच्या आरोपांमुळे भाजपचे राजपूत खासदार ब्रिजभूषण सिंह यांच्याबद्दल जाट समाजात नाराजी आहे. राजस्थानमधील ओबीसी मतदार मुळातच जात जनगणनेच्या आश्वासनामुळे प्रभावित झालेले दिसत नाहीत; परंतु इतर कारणांमुळे त्यांचा कल भाजप किंवा काँग्रेसकडे झुकतो. राजस्थानमध्ये सुमारे ६० आमदार आणि ११ खासदार ओबीसी आहेत. यापैकी जाटांची लोकसंख्या (सुमारे नऊ टक्के) सर्वाधिक मानली जाते. त्यानंतर गुर्जरांची लोकसंख्या सात टक्के इतकी आहे. राजस्थानच्या ओबीसी मतदारांमध्ये भाजपचा प्रभाव जास्त आहे. काँग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांनी तिकीट देताना संभाव्य ओबीसी लोकसंख्या विचारात घेतली होती. भाजपने ७० तर काँग्रेसने ७२ ओबीसी उमेदवारांना तिकिटे दिली. काही जाट पट्ट्यांमध्ये भाजपविरोधातील नाराजी बाजूला ठेवली, तर भारतीय जनता पक्षाचा येथिल ओबीसी समाजावर चांगला प्रभाव आहे. यावेळी गुर्जर काँग्रेसकडे एकतर्फी झुकलेले नाहीत. अशा काही ओबीसी जाती आहेत, ज्या समाजातील महत्वाच्या नेत्यांमुळे काँग्रेस आणि भाजपमध्ये विभागल्या गेल्या आहेत. २०१८ मध्ये तत्कालीन प्रदेश काँग्रेस अध्यक्ष सचिन पायलट मुख्यमंत्री होतील, या अपेक्षेने गुर्जरांनी आपली संपूर्ण ताकद काँग्रेसच्या मागे लावली होती; पण गेल्या पाच वर्षात काँग्रेस पक्षात झालेली पायलट यांची अवस्था पाहता या वेळी राजस्थानातील गुर्जर काँग्रेस आणि भाजपमध्ये विभागलेले दिसत होते. भाजपने गुर्जर पट्ट्यातील पक्षाच्या निवडणूक प्रचाराची जबाबदारी दिल्लीचे गुर्जर खासदार रमेश बिधुरी यांच्याकडे सोपवली. त्यामागे हेही एक महत्त्वाचे कारण होते. या वेळी राजस्थानमधील ओबीसी मतदारांमध्ये पक्षासमोरील आव्हान लक्षात घेऊन राहुल यांनी जात जनगणनेची युक्ती आजमावली खरी, पण काँग्रेस पक्षाला उशीर झालेला दिसला.

राजस्थानमधील कामगार संघटनेचे नेते आणि लोकतांत्रिक मोर्चाचे संयोजक अर्जुन देठा म्हणतात, मुख्यमंत्र्यांनी जात सर्वेक्षणाचे आदेश द्यावेत यासाठी आम्ही ऑगस्ट २०२१ मध्ये पत्र लिहिले होते. हा आदेश देऊन ओबीसी लोकसंख्येच्या आधारे आरक्षण देण्याचा काँग्रेसचा मानस दाखवता आला असता; पण आता तो राजकीय संधिसाधूपणा ठरताना दिसत आहे. आज राजस्थानमध्ये बेरोजगारीचा दर २८.५ टक्के आहे. राज्यात ओबीसींसाठी २१ टक्के आणि गुज्जरांसह इतर अत्यंत मागासवर्गीयांसाठी पाच टक्के आरक्षणाची तरतूद आहे. राज्य सरकारच्या अनेक जागा रिक्त आहेत. त्यात राज्य नोकरभरतीचे पेपरफुटीचे प्रकरण गाजले. प्रचाराच्या काळात महिला तसेच युवकांनी त्याबाबत व्यक्त केलेली नाराजी लक्षात घेतली, तर काँग्रेसला हा मुद्दा अडचणीचा ठरू शकतो. त्याच वेळी राजपूत समाजाच्या मदतीने सत्तेत येण्याच्या रणनीतीवर भाजप काम करताना दिसला. राजपूत समाजात वसुंधराराजे आणि पक्षाप्रती दीर्घकाळ नाराजी होती. हे पाहता त्यांना बाजूला करण्याचा प्रयत्न भाजपने केला. राज्यातील विधानसभा निवडणुकीत राजपूत समाजातील अनेक नेत्यांना पक्षाने प्राधान्य दिले. पक्षाने अरुण सिंह यांना राज्य प्रभारीपदाची जबाबदारी दिली आणि राजपूतांना पक्षाशी जोडण्याची जबाबदारी सोपवली. त्यासाठी पक्षानेही त्यांना मोकळा हात दिला. पक्षाच्या सूत्रांवर विश्वास ठेवला तर राजस्थानमधील राजपूत समाजाची नाराजी दूर करण्यासाठी भाजप एका राजपूत चेहऱ्याला मुख्यमंत्री बनवू शकते.

राज्यातील राजपूतांना पाठिंबा देण्यासाठी भाजपने जाट समाजालाही बाजूला केले असल्याचे राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे. यामागे अनेक कारणे आहेत. महाजन, ब्राह्मण वर्गासह राजपूत समाजही भाजपमध्ये सामील झाल्यास पक्षाचा सत्तेत येण्याचा मार्ग सुकर होईल, असा विश्वास नेतृत्वाला वाटतो. अशा स्थितीत विधानसभा निवडणुकीत पक्षाने या समाजावर सर्वाधिक लक्ष केंद्रित केले. वसुंधरा राजे या राजस्थानमधील भारतीय जनता पक्षातील एक महत्वाचा चेहरा आहेत. राजे दोन वेळा राज्याच्या मुख्यमंत्री राहिल्या आहेत. आताही निवडणूक प्रचारादरम्यान त्यांच्या सभांना सर्वाधिक गर्दी होत आहे; पण पक्षाने वसुंधरा राजे यांना राज्यात भाजपचा चेहरा बनवले नाही. राज्यात नुकत्याच झालेल्या मोदी यांच्या सभांना वसुंधरा राजे यांना निमंत्रित करण्यात आले नव्हते. वसुंधरा राजे यांच्या कार्यकाळात दिया कुमारी यांच्या संपत्तीचा वाद, आनंदपाल सिंग एन्काउंटर, माजी केंद्रीय मंत्री जसवंत सिंग यासारख्या मुद्द्यांवरून राजपूतांमध्ये त्यांच्याविरोधात नाराजी वाढल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. परिणामी, २०१८ मध्ये पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले. वसुंधरा राजे यांना बाजूला करण्यासाठी पक्षाने केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, विरोधी पक्षनेते राजेंद्र राठोड, खासदार दिया कुमारी, राज्यवर्धन सिंह राठोड या नेत्यांना तयार केले. तिकीटवाटपात सर्वाधिक पसंती विरोधी पक्षनेते राजेंद्र राठोड आणि प्रदेश प्रभारी अरुण सिंह यांना देण्यात आली. पुरेशा बहुमताने पक्ष सत्तेवर आल्यास यापैकी एका चेहऱ्याला राज्याचा मुख्यमंत्रीही करता येईल. त्यामुळे शिंदे गटाच्या अनेकांनी बंडखोरी केली आहे.

राज्यातील राजपूत समाजाची नाराजी पाहून भाजपने नुकताच एक प्रयोग केला. त्याद्वारे राजेंद्र राठोड यांना विरोधी पक्षनेते करण्यात आले. पुनिया हे जाट समाजाचे नेते असल्याने त्यांना प्रदेशाध्यक्षपदावरून हटवण्यात आले. त्यांच्या जागी ब्राह्मण चेहरा खासदार सी. पी. जोशी यांना प्रदेशाध्यक्ष करण्यात आले. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे पुनिया अध्यक्ष असताना राजपूत समाज पक्षापासून अंतर राखत होता. खरे तर शेतकरी आंदोलनात जाट भाजपपासून दूर गेले होते, असे जाणकारांचे म्हणणे आहे. अशा स्थितीत जाट नेता प्रदेशाध्यक्षपदी असल्याने पक्षाला फारसा फायदा होत नव्हता. राजपूत समाजाचे नुकसान होण्याची भीती पक्षाला वाटू लागली होती. अशा स्थितीत पक्षाने राजपूत समाजाच्या नेत्यांना मदत करायचे ठरवले. त्यामुळेच विधानसभा निवडणुकीत बहुतांश राजपूत नेत्यांचा पक्षात समावेश करण्यात आला होता. भाजपसोबतच्या युतीवर राजपूतही नाराज आहेत. राजपूत समाजात केवळ भाजपच नव्हे, तर संघाविरोधातही तीव्र नाराजी असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने समाजाच्या पूर्वजांच्या इतिहासाशी छेडछाड करण्याचा प्रयत्न केल्याचे या समाजातील ज्येष्ठांचे मत आहे. गेल्या वर्षी पक्षाने माजी उपराष्ट्रपती भैरोसिंह शेखावत यांचा शंभरावा वाढदिवस मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याची रणनीती राबवली. निवडणुकीपूर्वी, भाजपने राजपूत समाजाचे दिग्गज आणि सुप्रसिद्ध नेते देवी सिंह भाटी यांच्या घरवापसीचे आयोजन केले होते. यानंतर मेवाड राजघराण्यातील विश्वराज सिंह मेवाड आणि राजपूत नेते लोकेंद्र सिंह कालवी यांचा मुलगा भवानी सिंह कालवी यांचा पक्षात समावेश करण्यात आला. पक्षाने नाथद्वारातून विश्वराज सिंह मेवाड यांना उमेदवारी दिली तर जयपूरच्या राजघराण्यातील खासदार दिया कुमारी यांना विद्याधरनगरमधून आणि खासदार राज्यवर्धन राठोड यांना झोटवाडामधून निवडणूक लढवण्यासाठी मैदानात उतरवण्यात आले आहे. विरोधी पक्षनेते राजेंद्र राठोड स्वतः तारानगर मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. पक्षाने राज्यातील २५ सर्वसाधारण जागांवर राजपूत नेत्यांना तिकीट दिले. या पार्श्वभूमीवर विविध समाजघटक काँग्रेस आणि भाजपच्या मागे कसे उभे राहतात, यावर विजयाची गणिते अवलंबून आहेत.

आजकाल

याला सरकारी नक्षलवाद म्हणावे काय?

आदिवासी भारताचे नागरीक नाहीत का? त्यांचे संविधानिक हक्क हे आपल्यासारखे नाहीत का? हे प्रश्न पडतात कारण महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यातील, एटापल्ली तालुक्यातील तोडगट्टा येथे स्थानिक माडीया आदिवासी व बिगर आदिवासी दिनांक ११ मार्च २०२३ पासून ठिय्या आंदोलनाला बसलेत. आज आंदोलनाचा २५५ वा दिवस सुरु आहे. महाराष्ट्रातील किती न्यूज चॅनेल्स आणि वृत्तपत्रांनी आजवर या आंदोलनाची दखल घेतली?

या आंदोलनात सुरजागड मधील एकूण ७० ग्रामसभा व सुमारे ५०० पेक्षा जास्त आंदोलक सहभागी आहेत. ग्रामसभांनी संविधानिक मार्गाने रितसर ठराव करुन आंदोलन सुरु केले. स्वतःच्या घरातील धान्य हीच लोकवर्गणी. संविधानावरील विश्वास, स्वतःच्या हक्कासोबत पर्यावरण वाचवणे ही प्रबळ इच्छाशक्ती! या ताकदीवरच हे आंदोलन सुरु आहे. १ वर्षांत ३६५ दिवस असतात. यापैकी २५५ दिवस हि हाडामासाची जिवंत माणसं आपल्या यातना जगाला ओरडून सांगत आहेत. पण त्यांच्याकडे लक्ष द्यायला कोणालाच वेळ नाही.

हे आंदोलन विकासाला विरोध म्हणून अजिबात सुरु नाही. तर शासकीय खाणकाम नियमांना डावलून बेसुमारपणे सुरु असलेल्या उत्खननाला विरोध म्हणून सुरु आहे. बेसुमार उत्खननामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतोय. त्यामुळे प्रदूषण प्रचंड वाढलंय. प्रदूषणामुळे सूरजागड परीसर विविध आजारांच्या विळख्यात सापडला. सततच्या महाकाय डंपर व ट्रक यांच्या अवजड वाहतुकीमुळे या भागातील रस्ते प्रचंड खराब झाले. व्यसनाधीन परप्रांतीय चालकांच्या बेफिकीर वर्तनामुळे अपघातांचे प्रमाण वाढले. शून्य क्राईम रेट असलेल्या या विभागात वासनांध परप्रांतीयांनी बलात्कारासारखे गंभीर गुन्हे केलेत. परप्रांतीयांमुळे विभागात अवैध धंदे जन्माला आले व फोफावले. सामान्य लोकांचे जीवन अवघड होवून बसले.

सरकारला विकास या गोंडस शब्दाच्या नावाखाली सूरजागड आणि एटापल्ली तालुक्यातील प्रस्तावित लोहखाणींना स्थानिक ग्रामसभेचे अधिकार पायदळी तुडवून पेसा कायद्याला हरताळ फासून खाणकाम करायचे आहे. तोडगट्ट्याचे हे गत २५५ दिवसांपासून 'दमकोंडावाही बचाव संघर्ष समिती'च्या नावाखाली ग्रामसभांचे साखळी आंदोलन आता सरकारला त्रासदायक वाटत आहे. सुमारे ७० ग्रामसभा म्हणजे ७० गावांचा आवाज सरकारला कायमचा चिरडायचा आहे.

गडचिरोली जिल्हा अनूसूचित क्षेत्र असून पेसा व वनाधिकार कायद्यांच्या तरतुदींनुसार स्थानिक ग्रामसभांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील जल, जंगल, जमीन आणि इतर वन्य संसाधनांचे संरक्षण करण्याचे अधिकार आहेत. मात्र तरीही सूरजागड, एटापल्लीच्या हद्दीतील ग्रामसभांचे खाणकाम ाबाबतचे ठराव दिलेले नसताना प्रशासनांकडून कंपन्याच्या मालकांना झुकते माप देवून लोहखाणी प्रस्तावित करण्याचे काम केले जात आहे. याला सरकारी नक्षलवाद म्हणावे का? या भागाचा विकास करायचा असेल तर अधिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर द्यायला हवा. परंतु सरकारला केवळ खाणींमध्ये व बेसुमार उत्खननामध्ये रस आहे.

अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांची सोय स्थानिक स्वतः करतात. सरकारने फक्त सार्वजनिक आरोग्य सुविधा, सार्वजनिक प्रवासी वाहतूक व शिक्षणासाठी पायाभूत सुविधा तसेच स्थानिक भाषेतून शिक्षण देणे अपेक्षित आहे. मात्र विद्यमान सरकारकडून केवळ जंगलकटाई करत सिमेंटचे रस्ते निर्माण करुन बेसुमार खाणकाम करण्याला उत्तेजन दिले जाते आहे. या प्रकारामुळे स्थानिक जंगले नष्ट होऊन आदिवासींचा नैसर्गिक अधिवास धोक्यात आला आहे. या सरकारी झोटींगशाहीच्या विरोधात आपले अस्तित्व टिकवण्यासाठी ७० गावांचे बहुमताने आंदोलन सुरुय.

हा संविधानिक आवाज कायमचा दाबण्यासाठी काही आंदोलकांना का पोलीसांनी सरकारी आरोप लावून तुरुंगात डांबले आहे. या आंदोलनाला आंदोलनाला नक्षलवाद्यांची फ ुस आहे, असा कागदोपत्री पुरावा पोलीसांकडे एव्हाना तयार झाला असेलच. शिवाय पोलिसी खाक्या व बळ वापरुन आंदोलक आदिवासींच्या झोपड्यांची नासधूस केलीय.

गडचिरोलीतील आंदोलन मोडून काढणे प्रशासनासाठी फारच सोपे आहे. आंदोलकावर नक्षलवाद चळवळीशी संबंधित शिक्के मारुन विविध कलमांखाली उचलले की स्थानिकांना तोंड दाबून बुक्क्यांचा मार झक मारत सहन करावा लागतो. आंदोलनाला नक्षलींची फूस असल्याचे साक्षात्कार तर रोजच 'आहे रे' वर्गाला आणि सत्ताधारी राजकारण्यांना होत असतात.

लक्षात ठेवा... २०१४ नंतर केवळ त्याच व्यक्तीला आणि त्याच आंदोलनाला मेनस्ट्रीम मेडीयात प्रसिध्दी मिळते. जे आंदोलन सत्ताधारी पुरस्कृत असतंय. बाकीची आंदोलने अशीच चिरडली जातात. आणि हे ठावूक असलेले सूज्ञ भारतीय आदिवासी पंजाबच्या शेतकऱ्यांप्रमाणेच संविधानावर विश्वास ठेवून डोळ्यातील पाण्यासोबत शिळ्या भाकरीचा तुकडा पोटात ढकलत बसलेत.

- तुषार गायकवाड

लोकसंसद

गुन्हेगारीचा वाढता आलेख चिंताजनक

मुंबईतील दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या सर्व प्रकारच्या गुन्ह्यांवर प्रकाशझोत टाकणारा प्रजा फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेचा अहवाल नुकताच प्रसिद्ध करण्यात आला. पोलीस व कायदा सुव्यवस्थेतील सुधारणांना प्राधान्य देण्याची गरज असल्याचे या अहवालात म्हटले आहे. जगभरात सर्वच ठिकाणी सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असताना मुंबईही त्याला अपवाद नाही. २०१८ ते २०२२ या दरम्यान सायबर गुन्ह्यांमध्ये २४३ टक्क्यांनी वाढ झाली. २०२२ मध्ये नोंदवलेल्या सायबर गुन्ह्यांमधील गुन्हेगार सापडण्याचे प्रमाण केवळ ८ टक्के होते. क्रेडीट कार्ड घोटाळे तसेच फसवणुकीच्या गुन्ह्यांचे प्रमाण ६५७ टक्क्यांनी वाढले.

२०२२ मध्ये दाखल झालेल्या एकूण बलात्काराच्या गुन्ह्यांपैकी ६३ टक्के प्रकरणे ही अल्पवयीन मुलींवरील बलात्काराची होती. जुलै २०२३ पर्यंत मुंबईच्या पोलीस दलात ३० टक्के मनुष्यबळाची कमतरता असल्याचे आढळून आले. त्यातही प्रामुख्याने गुन्ह्यांच्या तपासकार्याची जबाबदारी असलेल्या पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक इत्यादी अधिकारी पदावरील मनुष्यबळाची २२ टक्के कमतरता आहे. ही पदे रिक्त असल्याने तपास कार्यावर परिणाम होत असल्याचे अहवालात नोंदविण्यात आले आहे. मुंबई हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शहर असून वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर या शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आणि चोख राखण्यासाठी हा अहवाल महत्वाचा असून राज्य शासन त्याची योग्य दखल घेईल अशी अपेक्षा आहे.

-प्रदीप शंकर मोरे

व्हायरल

ना किसी की आँख का नूर हूं

रैनबसेरा आयुष्यात अशी जागा असणं ही किती दिलाश्याची गोष्ट! दिवसभर उन्हातान्हात , वेगवेगळे टक्केटोणपे खात माणूस दरबदर हिंडत रहातो, अपमान, निराशा, राग, आनंद अश्या अनेक अनुभवातून जात राहतो. आणि रात्री हा थकला भागला जीव त्याच्या रैनबसेऱ्याला परततो..

या जागेत कोणतंही न करता, निरपेक्ष प्रेमानं, आदरानं, जिव्हाळ्यानं त्याला स्वीकारलं जातं. तिथं त्याच्यासाठी एक असतो, ऊब असते, सुकून असतो. सगळ्या काळज्या , त्रास, विवंचना विसरून तो विसावतो, दुसऱ्या दिवशीच्या प्रवासाला सज्ज होण्यासाठी, आणि पुन्हा रात्री इथंच येण्यासाठी. यापेक्षा भारी असतं कुणाचा तरी रैनबसेरा होण्यात ! थकला भागला जीव आपल्या विसाव्याला येतो. त्याच्या आत्मसन्मानाला जराही धक्का न लावता त्याच्या जखमांना आपण हळुवार मलमपट्टी करतो. त्याला न विचारतासुद्धा त्याच्या गरजा समजून घेतो. त्याच्यापर्यंत आपलं प्रेम पसरून देतो. त्याला सुरक्षित वाटू देतो. त्याला शांती , सुकून मिळेल याचा आटोकाट प्रयत्न करतो, आणि हे सगळं निरपेक्ष वृत्तीनं! आपल्या वेदना, आपली दुःखं त्याला अजिबात जाणवू देत नाही. उद्या उजाडता हा माणूस पुन्हा बाहेर पडणारच आहे, माहित नाही कुणाला भेटेल, कोणकोणत्या स्थित्यंतरातून जाईल, कोणते आनंद , कोणत्या नव्या जखमा घेऊन येईल! पण आपण त्याच्यासाठी असूच. पुन्हा पुन्हा त्याच प्रेमानं, त्याच ओढीनं! त्याचा आजन्म रैनबसेरा .. जगातली सगळ्यात कमनशिबी माणसं तीच ज्यांच्या नशिबी ना असला रैनबसेरा असतो ना जे दुसऱ्या कुणासाठी रैनबसेरा असतात. ना किसीकी आंख का नूर हूं, न किसीके दिल का करार... अशी परिस्थिती...

- रंजना बाजी..

.....

आजकाल खूपवेळा वाचायला मिळते की ''कर्मा बिच'' ''कर्मा रिटर्न्स'' आपल्याकडे सुद्धा म्हण आहे.... पेरावे तसे उगवते , किंवा करावे तसे भरावे.

पण हे अर्धसत्य वाटते मला, जगात वावरताना अनुभव घेताना, वरील म्हणींचा प्रत्यय नेहमी येतोच सर्वांना, असे नाही वाटत.

कितीतरी, सुस्वभावी पापभिरू संकटात लोकांना मदत करणारी माणसे, दुर्दैवाचे दशावतार अनुभवताना दिसतात. कित्येक फ्रॉड लोक , लोभी व्यक्ती कित्येक लाखो कोटींचे घोटाळे करून, मस्त जगत असतात.

आणि कितीतरी साधीसरळ माणसे स्वतःच्या मुलांना पैशा अभावी उच्चशिक्षण सुद्धा देऊ शकत नाहीत. किंवा घरात कोणीतरी असाध्य रोगाने आजारी असते, कोणाचे एकुलत्या एक अपत्याचा अकाली मृत्य होतो. असे काय मोठे कुकर्म केलेले असते की त्यांना पुत्रवियोगाचे जगातील सर्वात मोठे दुःख भोगावे लागते? मला स्वतःला तरी असे वाटते, नियतीला चांगलं वाईट असे काहीही कळत नाही. विजेसारखी ती कधी कोणावर कोसळून उध्वस्त करेल आयुष्य, हे सांगू शकत नाही.मला इतकेच वाटते, मी माणुसकीने वागतोय कारण मग माझ्यापण वाट्याला चांगली वागणूक येईल, असा विचार करत जगणे हे फोल आहे. आपण माणुसकीने वागावे कारण ते केल्याने मला समाधान लाभते. इतकेच फक्त असावे. या लहरी नियतीच्या फाटकाऱ्याला, आपण सगळेच मनातून घाबरत असतो, ती सुप्त भीती प्रत्येकाच्या मनात असते. ह्या सुप्तभीतीला जो व्यवस्थित सांभाळू शकला,त्याचे आयुष्य खऱ्या अर्थाने आनंदी असते. ही मनातील सुप्तभीती,हेच उगमस्थान आहे देवाचे, भक्तीचे , श्रद्धेचे. मन सुदृढ करण्याचे अनेक मार्ग म्हणजे हे सर्व. आणि ज्याला स्वतःचे मन सुदृढ करण्यात यश आले, तो सुखी.

केदार सोमण

प्रेरणा

समचरणदृष्टि

समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।
तेथें माझी हरी वृत्ति राहो ।
आणीक न लगे मायिक पदार्थ ।
तेथें माझें आर्त्त नको देवा ।
ब्रम्हादिक पदें दुःखाची शिराणी ।
तेथें दुश्चिंत झणी जडों देसी ।
तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म ।
जे जे कर्मधर्म नाशवंत ।

अर्थ

हे हरी तुमचे चरण विटेवर सम आहेत तुमची दृष्टीही सम आहे आणि अशा तुमच्या साजऱ्या रूपावर माझी वृत्ती स्थिर राहो.आणि देवा या व्यतिरिक्त मला कोणतेही माइक पदार्थ म्हणजे मायेने व्यापलेले पदार्थ नको व त्या ठिकाणी माझी तृष्णा इच्छा देखील राहू देऊ नका.हे देवा ब्रह्मादिक पदे व या सारखे पदे उच्च ठिकाणी माझे मन जडू देऊ नको कारण ते पद म्हणजे एक प्रकारची दुःखाची शीराणीचा आहे. तुकाराम महाराज म्हणतात देवा जे जे काही कर्म धर्म आहे त्याचे वर्म आता आम्हाला समजले आहे ते म्हणजे असे की हे सर्वकाही नाशिवंत आहे.

राज्य नाट्य स्पर्धेत उरणचा सहभाग

। उरण । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेसाठी उरणमधील पैशाने तुटली नाती व कपट्टयम ही दोन नाटक सहभागी झाले आहेत. महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित ६२ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२३-२४ ची प्राथमिक फेरी स्थळ डॉ. काशिनाथ घाणेकर (मिनी) नाट्यगृह ठाणे येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर स्पर्धा मंगळवार दि. २८ नोव्हेंबर २०२३ पासून सुरू होऊन दि. ४ जानेवारी २०२४ पर्यत असणार आहे.

या स्पर्धेसाठी उरण ग्रामीण भागातील आई एकविरा सांस्कृतिक कलामंच, भेंडखळ यांच्या वतीने लेखक हसुराम पाटील, दिग्दर्शक पनेश्वर म्हात्रे यांचे पैशाने तुटली नाती हे नाटक दि. मंगळवार दि. २८ नोव्हेंबर रोजी होणार आहे. तर फ्रेंड्स सामाजिक कलामंच वतीने लेखक किरण घरत व दिग्दर्शक चंद्रविलास घरत यांचे कपट्टयम हे नाटक बुधवार दि. ६ डिसेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता होणार आहे. तरी उरणमधील नाट्यरसिकांनी मोठया संख्येने सहभाग घेऊन नाटकास प्रोत्साहन देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी उरण ग्रामीण भागातील दोन नाटक स्पर्धेसाठी सहभागी झाल्याने उरणकरांना याचा निश्चितच अभिमान वाटत असल्याचे नाट्यरसिक सांगत नक्कीच ते बक्षिसास प्राप्त ठरतील असा विश्वासही व्यक्त करीत आहेत.

आंदोलनाचा इशारा

। रसायनी । वार्ताहर ।

सर्व दुकाने आणि आस्थापनांवर मराठी नामफलक लावण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दोन महिन्याची वाढीव मुदत दिली होती. ती शनिवार २४ नोव्हेंबरला समाप्त होत आहे. त्यानंतर ही अनेक दुकाने व आस्थापनाचे नामफलक इंग्रजी व अन्य भाषेत आहेत. काही फळक मराठी भाषेत लहान अक्षरात लिहीलेली आहेत. नियमाप्रमाणे नामफलक हे ठळक मराठी असताना २४ नोव्हेंबरपूर्वी या आदेशाची अंमलबजावणी करणे हे बंधनकारक आहे. या निर्णयाची अंमलबजावणी संदर्भात मनसेना आग्रही आहे. असे न झाल्यास दुकान व आस्थापनाविरोधात मनसेतर्फे न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येईल असा इशारा रसायनीतील मनसेचे दिपक कांबळी, अविनाश पडवळ यांनी दिला आहे.

तुडाळ येथे मोफत नेत्रतपासणी

। सोगाव । वार्ताहर ।

दी लाईफ फाऊंडेशन आणि शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल, यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन शनिवार २५ नोव्हेंबर रोजी लुंबिणी बौध्द विहार, सायमन कॉलनी तुडाळ-वायशेत येथे सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरांत पिवळ्या आणि केशरी रेशनकार्ड धारकांची मोफत मोंतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येईल. मोतीबिंदू शस्त्रक्रियासाठी येणाऱ्या रुग्णांनी येताना रेशनकार्ड आणि आधारकार्डची झेरॉक्स प्रत सोबत आणावी तसेच मधुमेहाची किंवा रक्तदाबाची औषधे सुरू असल्यास ती सोबत आणावी. शिबिराच्या दिवशी अल्प दरात चष्मे उपलब्ध असतील. तरी सर्व गरजू बांधवांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन दी लाईफ फाऊंडेशन तर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी दी लाईफ फाऊंडेशनचे कार्यकर्ते शिलानंद इंगळे- ९३२५०५४२८०, राखी राणे- ८८३०९८०१६१, प्रणय ओव्हाळ - ८१४९४३७३७१यांना संपर्क साधावा.

रत्नाकर घरत यांना पुरस्कार

। रसायनी । वार्ताहर ।

जिल्ह्यातील आदिवासी समाजाला मार्गदर्शन करून त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सतत प्रयत्नशील असणारे सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत यांना महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी सेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी जिल्ह्यातील प्रत्येक आदिवासी कुटुंबासाठी पिण्याचे पाणी, रस्ते , विजेचे प्रश्न, नेत्र चिकित्सा शिबीर, आरोग्य शिबिराच्या कामा कम केले होते. या कार्यची दखल घेत त्याना हा पुरस्कार देण्यात आला.

लक्ष्मण थळे यांचे निधन

। सोगाव । वार्ताहर ।

टाकादेवी-बहिरोळे येथील लक्ष्मण रघुनाथ थळे (वय ७१) यांचे बुधवार दि. १५ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, तीन सुना, चार नातवंडे, एक भाऊ, भावजय असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी २४ नोव्हेंबर रोजी राहत्या घरी सकाळी ८:३० वाजता होणार आहे. तर बारावा रविवार दि.२६ नोव्हेंबर रोजी राहत्या घरी होणार आहे, असे थळे कुटुंबियांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

बेडीसगाव रस्त्याचे काम सुरू

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्याचे शेवटचे टोक असलेल्या बेडीसगाव येथील शाळेच्यावाडीमधील रस्त्याचे काँक्रीटीकरण स्थानिक ग्रामस्थ यांच्या देखरेखेखाली सुरू करण्यात आले. स्थानिक ग्रामस्थांकडून रस्त्याचे काँक्रीटीकरण राजिप बांधकाम विभागांच्या नियमाचे पालन करून केले जात आहे. रस्ता टिकावू व्हावा यासाठी ग्रामस्थ जातीने लक्ष ठेवून आहेत.या गावातील शाळेची वाडी येथील २०० मीटर लांबीच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येत आहे. २५/१५ अंतर्गत शाळेच्या वाडी म धील रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याचे काम करीत आहेत. त्या भागातील रस्त्याबद्दल परिसरातील ग्रामस्थांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे यांच्याकडे तक्रार केल्या होत्या. त्यामुळे बांधकाम विभाग यांच्याकडून रस्त्याच्या कामासाठी उपअभियंता खिल्लारे आणि शाखा अभियंता गोरे यांनी रस्त्याची पाहणी केली.

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग

हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड

दूरध्वनी क्र.०२१४१-२२४१३१ फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८
ई-मेल : collector.raigad@maharashtra.gov.in ई-मेल : dydeoraigad@gmail.com
क्र/निवडणूक/कार्या/६(२) फिरते वाहन निविदा/२०२३ दिनांक :२३/११/२०२३

लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४
ई-निविदा सुचना क्रमांक ०१/२०२३
फिरते वाहन (Moblie van) पुरवठा बाबत ई निविदा सुचना

आगामी लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक निवडणक २०२४ च्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्रिये दरम्यान जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी फिरते वाहन (Moblie van) भाडे तत्त्वावर पुरवठा करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेत येत आहे.

कामाचे नाव : रायगड जिल्ह्यातील लोकसभा/ विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रिये दरम्यान फिरते वाहन (Moblie van) भाडे तत्त्वावर पुरवठा करणेबाबत

निविदा अंदाजित रक्कम	रू.५० लक्ष
ई निविदा फार्म शुल्क	रू.४,८००/-(विना परतावा)
इसारा/बयाणा (EMD) रक्कम	रू.८०,०००/-
सुरक्षा अनामत रक्कम	रू.१,५०,०००/-
ई-निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वेळ	दि.२४/११/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता
ई-निविदा भरण्याचा कालावधी	दि.२४/११/२०२३ रोजी सकाळी १०.०० पासून ते दि.०२/१२/२०२३ रोजी सायकाळी ६.०० पर्यंत
निविदा पूर्व बैठक (prebid Meeting) दिनांक व वेळ	दि. २८/११/२०२३ सकाळी ११ वाजता
ई-निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ	दि.०२/१२/२०२३ सायंकाळी ०६.०० वाजता
ई-निविदा फार्म क्रमांक-१(तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ	दि.०४/१२/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजता किंवा तदूंनतर
ई-निविदा उघडण्याचे ठिकाण	उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय
संपर्क अधिकारी	उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड-अलिबाग

निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी

१.सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन भरून त्याची पावती स्कॅन करून अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करून Briefcase-I मध्ये अपलोड करावीत. व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करून Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२.प्राप्त निविदा करणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.
३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करून घ्यावी.
५.सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करून PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (prebid Meeting) **ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पुर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांचे दालनात राहील.**

सही/-
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी रायगड

पनवेल महानगरपालिका

ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय - ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय - ०२२-२७४५५७५१ आयुक्त कार्यालय- ०२२-२७४५२३३९
ई मेल-pavelcorporation@gmail.com वेबसाईट-www.panvelcorporation.com

जा.क्र.पमपा/आस्था/से.नि.अ./५१२३/प्र.क्र. ३३/१३९९/२३ दिनांक : २४/११/२०२३

थेट मुलाखत (Walk in Interview)

पनवेल महानगरपालिकेने विवक्षित कामकाजाकरीता खालील नमूद केल्याप्रमाणे शासकीय/निमशासकीय कार्यालय तसेच नगरपरिषद/नगरपालिका/महानगरपालिकेच्या सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांकरीता, कंत्राटी तत्वावर/ठोक मानधनावर करार पद्धतीने खालील अटी व शर्ती नुसार सेवा प्राप्त करून घेण्यासाठी दि. ०४/१२/२०२३ रोजी थेट मुलाखत (Walk in Interview) आयोजित केली आहे. इच्छुक उमेदवारांनी दि. ०४/१२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके, नाट्यगृह, पनवेल येथे आपली मूळ कागदपत्रे, सेवा निवृत्तीचे प्रमाणपत्र, अंतिम वेतन प्रमाणपत्र, ना विभागीय चौकशी, प्रमाणपत्र व अनुषंगिक कागदपत्रे घेऊन स्वतः हजर रहावे. सविस्तर माहिती महापालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पदाचा संवर्ग	अनुभव	मानधन
सेवानिवृत्त अधिकारी आस्थापना विभाग (पद संख्या ०१)	शासकीय/नगरपरिषद/न.पा./म.न.पा. मध्ये सेवेत असताना किमान ५ वर्षे आस्थापना विभागात काम केल्याचा अनुभव	म.शा.सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. १७/१२/१६ आणि
१. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी (पदसंख्या २०) २. सेवानिवृत्त लेखाधिकारी (पदसंख्या ०१) ३. सेवानिवृत्त लेखा परीक्षक (पदसंख्या ०१)	शासकीय/निमशासकीय/नगर परिषद/न.पा./ म.न.पा. मध्ये सेवेत असताना किमान ५ वर्षे मालमत्ता व कर विभागात काम केल्याचा अनुभव	दि. ८/९/२०२३ मध्ये विहित असलेले किंवा विशेष बाबींमध्ये मा. आयुक्त यांनी निश्चित केलेले ठोक मानधन

अटी व शर्ती :-
१) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.
२) नियुक्तीसाठी सक्षम असलेल्या प्राधिकरणाने विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा कर्मचाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.
३) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.
४) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (confict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.
५) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींस प्राप्त होणाऱ्या अधिकारा अंतर्गत येणारे आवश्यक दस्तऐवज/कागदपत्रे माहिती व आधार सामुग्री याबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
६) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींने त्यांच्यावर सोपविलेले कामकाज, निश्चित केलेल्या विहीत कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.
७) सदरची सेवा ही फक्त ३ वर्षाच्या मर्यादेकरिताच राहणार आहे. तथापि १ वर्षाच्या कालावधीत त्यांचे मूल्यमापन करून पुढे सदरची सेवा सुरू ठेवणे किंवा नाही, याबाबत महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.
८) यापूर्वी करण्यात आलेल्या सेवा कालावधीचा तपशील तसेच विभागीय चौकशी, फौजदारी गुन्हा याबाबतची माहिती सदरच्या मुलाखती वेळी सादर करणे बंधनकारक राहील.
९) सदरच्या मुलाखती वेळी सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांसोबत स्व-घोषणापत्र भरून देणे बंधनकारक राहील.
१०) पनवेल महानगरपालिकेस आवश्यक तितकेच अधिकारी/कर्मचारी घेण्यात येतील.

सही/-
उपआयुक्त (मुख्यालय)
पनवेल महानगरपालिका

दिनांक : २५/११/२०२३

नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमूद मौजे सहाण, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) श्री. संजय रामभाऊ थळकर २) सौ. मनिषा संजय थळकर यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर, हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकित खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

मौजे सहाण, ता. अलिबाग, जि. रायगड

मौजे	गट नं.	एकूण क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
सहाण ता. अलिबाग	२४५/१	क्षेत्र ०-१८-२० पो.ख. ०-०२-८० एकूण क्षेत्र ०-२१-००	४.३३

दिनांक : २५/११/२०२३ सही/-
ॲड. समीर सुरेश नाईक
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट, जे.एस.एम. कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी मौजे माणगाव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक जगदीश दामोदर कराळे यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ हे.आर.	आकार
९७	२	०.५२.८ पो.ख. ०.०६.८० एकूण ०.५९.६० त्यापैकी विकत देणाऱ्याच्या मालकीचे क्षेत्र १९ गुंठे इतक्या क्षेत्राचे	९.४६

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. २५/११/२०२३
ॲड. तुषार रामचंद्र भवारे
००२, श्रावणधारा को.ऑप.हौ.सो.
ब्राह्मण आळी, नेरळ, ता. कर्जत
जि. रायगड ४१०१०१
९८५०८००८१३

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग.
केंद्र कार्यालय अलिबाग

प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉंड्रींग ॲक्ट २००२ व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार बँकाना सर्व खातेदारांचे वेळोवेळी के.वाय.सी.अपडेट करून घेण्याचे आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या परिपत्रक क्र.आरबीआय/डीबीआर/२०१५-१६/१८ मास्टर डायरेक्शन/डीबीआर/ए.एम.एल/बी.सी.नं.८१/१४.०१.००१/२०१५-१६, दिनांक २५.०२.२०१६ नुसार बँकेतील सर्व खातेदारांना सूचित करण्यांत येत आहे की, बँकेच्या खातेदारांनी के.वाय.सी.(आधार कार्ड, पॅन कार्ड, इलेक्शन कार्ड, पासपोर्ट, नरेगा जॉब कार्ड, ड्रायव्हींग लायसन्स) मुळ डॉक्युमेंटस् व अद्यावत फोटोसह डॉक्युमेंटची स्वःसाक्षांकीत प्रत घेवून संबंधित शाखेत (खाते असलेल्या शाखेत) उपस्थित राहून के.वाय.सी.अपडेशन करण्यासंदर्भात साक्षांकित प्रत जमा करून आम्हांला सहकार्य करावे.

सर्व खातेदारांनी वेळेवर के.वाय.सी.कागदपत्रांची अपडेशन केले गेले नाही तर प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉंड्रींग ॲक्ट २००२ व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे आपल्या खात्यावर व्यवहार करण्यास प्रतिबंध करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

सही/-
प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-सहाण, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची बागायत जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक अनिता श्याम महेंदु यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
सहाण ता.अलिबाग	२२६/३	००.१९.६८ पो.ख.००.०२.२७ एकूण ००-२१-९५	०४.८१

वर नमूद मिळकतीपैकी क्षेत्र ००-०५-०० हे.आर.क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्या प्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क या अन्य कोणत्याही तऱ्हेने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या आशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २५/११/२०२३
ॲड.राहुल रमेश नाईक
मु.नागांव, ता.अलिबाग
मोबा.क्र.९९२२७९८५२८

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **श्री.सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण,** नोकरी, धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- vacancy for accountant Required- Tally, Basic computer knowledge female only contact No. 8779075545
- **रबर (नायलॉन) स्टॅम्प्स,** वसंत क्लासेस, जैन मंदिरासमोर, बाजारपेठ, अलिबाग, (आधारकार्ड/कार्यालयाचे पत्र आवश्यक)
- English Speaking प्रमोशनमध्ये, बिझिनेसमध्ये, मुलाखतीमध्ये, परीक्षांमध्ये, कोर्सेसमध्ये सुयश पैसा देणारा मौल्यवान शॉर्ट कोर्स. परवडणारी फी- ९८२२८४२८१०
- **प्रथम, घटस्फोटित, विधुर, विधवा, व्यंग सर्वजातीय** स्थळांसाठी रोहा, गणेश महाकाळ : ८८८८९३५७७५
- **ऑफिससाठी ६००० चौ.फूट जागा भाड्याने मिळेल.** संपर्क :- रोकडे - ९२२६३७९८४४
- **नागाव मधील हॉटेलमध्ये काम** करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १. रेस्टॉरंट व किचन मॅनेजर २. ऑल राऊंडर कूक ३.नाश्ता बनवणारा कूक ४. हेल्पर कूक ५.नाईट शिफ्ट हाऊस किपींग २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा (व्हॉटसॲप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५ /७८७५८६६५५५
- **लग्नासाठी वर पाहिजे आहे.** वधूचे वय :- २२, ठिकाण : अलिबाग, मोबाईल नं. ७५०७९०९४३१, बायोडाटा या मोबाईल नंबरवर पाठवणे.
- **नोकरीची संधी अलिबाग बीचजवळ** 'अतिथी प्युअर व्हेज' हॉटेलमध्ये 'वेटर' पाहिजेत. संपर्क : ८००७२२२७२७
- **पत्रावळी पेपर डीश मशीन विक्री आमच्याकडे पत्रावळी,** पेपर डिश, मशीन मिळतील. तसेच सिल्व्हर व ग्रीन पेपर मिळेल. मुद्रा इंटरप्रायझेस पेण संपर्क : ८२३७४२४१२४
- **अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी मुलगी** पाहिजे. पात्रता : दहावी/बारावी पास कॉम्प्युटर येणे आवश्यक संपर्क:- ९९७०५०९४४०
- **जमिन विकणे आहे** कमी किंमतीत २० गुंठे ते ५ एकर पर्यंत ७८७५५८७०८४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

शुद्धीपत्रक

गुरूवार दि. २३/११/२०२३ रोजी कृषीवल वृत्तपत्रात पान नं. २ वर ग्रामपंचायत चेंढरे यांची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाली होती. त्या नोटीसीमध्ये ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव या कॉलममधील अनु क्र. ६ मधील नंदा किशोर देशमुख हे नजरचुकीने छापण्यात आले आहे, तरी ते तसे न वाचता नंदा मनोहर देशमुख असे वाचण्यात यावे.

जाहीर नोटीसीमधील उर्वरीत मजकुर जसाच्या तसा वाचण्यात यावा.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ
रायगड विभाग, पेण

क्र.राप/रायगड/वाह/वाणिज्य/७५७ दिनांक - २४-११-२०२३
ई-निविदा सूचना क्र. ०१/२०२३

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड विभाग, पेण-रामवाडी यांचेकडून निविदा सूचना क्र. ०१/२०२३ अन्वये वाणिज्य आस्थापनांकरिता ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. परंतु त्यामधील १) दुचाकी वाहनतळ-कर्जत बसस्थानक, २) उपहारगृह नागोठणे बसस्थानक, ३) उपहारगृह-खोपोली बसस्थानक या आस्थानांकरीता अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने सात दिवसांकरीता द्वितीय व अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर मुदतवाढीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	निविदेचा टप्पा	दिनांक व वेळ (पासून)		दिनांक व वेळ (पर्यंत)	
१	निविदा प्रकाशित करणे	२४.११.२०२३			
२	निविदा डाउनलोड करणे	२४.११.२०२३	१२.००	३०.११.२०२३	
३.	निविदा सादर करणे	२४.११.२०२३	१२.००	३०.११.२०२३	१५.००
४	निविदा उघडणे			०१.१२.२०२३	१५.००

सही/-
विभाग नियंत्रक
रा.प.रायगड विभाग, पेण

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकती त्यांचे मालक १) कुमार खंडेराव भोसेकर, २) सुधा कुमार भोसेकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे- धामोते, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमिन मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र चौरस मीटर	आकार रु. पै
९२	१६	३२०	३२-००

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेच्या कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल :-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

ॲड. प्रवीण शांताराम खडे

नवडक

धावांच्या पाठलागाचा विक्रम

विशाखापट्टणम : टी २० मालिकेच्या पहिल्या थरारक सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा दोन गडी राखून पराभव केला. भारताने २०९ धावांच्या विराट आव्हानाचा यशस्वी पाठलाग केला. याआधी २०१९ मध्ये वेस्ट इंडिजविरोधात २०८ धावांचा पाठलाग केला होता. भारताने टी २० क्रिकेटमध्ये सर्वाधिकवेळा २०० पेक्षा जास्त धावांचा यशस्वी पाठलाग केला आहे. भारताने आतापर्यंत ५ वेळा २०० पेक्षा जास्त धावांचा यशस्वी पाठलाग केला आहे.

राशिद खान दुखापतग्रस्त

नवी दिल्ली : अफगाणिस्तानचा अष्टपैलू खेळाडू राशिदने पाठीच्या दुखापतीमुळे ऑस्ट्रेलियन क्रिकेट लीग बिग बॅश लीगच्या मोसमातून आपले नाव मागे घेतले आहे. त्याच्या पाठीवर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तो बीबीएलमध्ये ॲडलेड स्ट्रायकर्सकडून खेळतो. बीबीएलचा १३ वा हंगाम ७ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. अंतिम सामना २४ जानेवारीला होणार आहे. ॲडलेड स्ट्रायकर्सने आपल्या निवेदनात राशिदच्या माघारीची माहिती दिली आहे.

अफगाण येणार भारत दौऱ्यावर

काबूल: भारत पुढील वर्षी अफगाणिस्तानसोबत टी-२० मालिका खेळून देशांतर्गत हंगामाची सुरुवात करेल. हा संघ जानेवारी महिन्यात अफगाणिस्तान संघाविरुद्ध ३ टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. मंगळवारी अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने या मालिकेचे वेळापत्रक जाहीर केले. पहिला सामना ११ जानेवारीला मोहालीत, दुसरा सामना १४ जानेवारीला इंदूरमध्ये आणि तिसरा सामना १७ जानेवारीला बेंगळुरूमध्ये खेळवला जाईल.

अय्यरने उरकला साखरपुडा

इंदूर : भारतीय क्रिकेटपटू व्यंकटेश अय्यर आता नवी खेळी खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. व्यंकटेशची नुकताच श्रुती रघुनाथनसोबत साखरपुडा झाला आहे, ज्याचे छायाचित्र व्यंकटेश अय्यरने आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवर शेअर केला आहे. या छायाचित्रामध्ये व्यंकटेश हिरव्या रंगाचा कुर्ता आणि श्रुतीने जांभळ्या रंगाची साडी परिधान केली आहे. पोस्टमध्ये त्याने आयुष्याच्या पुढच्या अध्यायाकड वाटचाल असे लिहिले आहे. अनेक क्रिकेटपटूंनी त्याचे अभिनंदन केले आहे.

सैनींच्या लग्नाचा उडाला बार

कुवेत: भारतीय संघाचा वेगवान गोलंदाज नवदीप सैनी याने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवरून लग्नाचे छायाचित्र प्रसिद्ध केले. अशात त्याच्यावर क्रिकेटप्रेमी आणि सहकाऱ्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. नवदीप सैनी आणि स्वाती अस्थाना यांनी हिंदू रीतिरिवाजानुसार सात फेरे घेऊन लग्न केले. या जोडप्याने लग्नात पांढऱ्या रंगाचा ड्रेस कोड परिधान केला होता. नवदीपने हा फोटो शेअर करताच, त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

भारताचा शेवटच्या षटकात थरारक विजय

रिंकूच्या षटकाराचा बोलबाला ; कर्णधार सूर्याही चमकला!

। विशाखापट्टणम । वृत्तसंस्था ।
एकदिवसीय विश्वचषक २०२३ च्या अंतिम सामन्यातील पराभवातून सावरणे कदाचित सोपे नसेल. पण भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना जिंकून ती निराशा काहीशी कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. विशाखापट्टणम येथे झालेल्या ५ सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा २ गडी राखून पराभव करत दमदार सुरुवात केली. पहिल्यांदाच भारताचा कर्णधार झालेल्या सूर्यकुमार यादवने विश्वचषकामधील अपयशाला मागे टाकत आपली स्फोटक शैली टी-२० मध्ये दाखवली, ज्याच्या जोरावर भारताने २०८ धावांच्या मोठ्या धावसंख्येचा सहज पाठलाग केला.

भारताने १९ षटकात ५ गडी गमावत २०२ धावा केल्या होत्या. भारताला विजयासाठी सहा चेंडूत सात धावा करायच्या होत्या. रिंकू सिंग आणि अक्षर पटेल खेळपट्टीवर होते. सीन ॲबॉटच्या पहिल्याच चेंडूवर रिंकूने चौकार ठोकला. यानंतर पाच चेंडूत तीन धावा हव्या होत्या. पुढच्याच चेंडूवर रिंकूने एक धाव घेतली.

यानंतर अक्षर पटेल तिसऱ्या चेंडूवर बाद झाला. त्याच्या पाठोपाठ फलंदाजीला आलेला रवी बिश्नोई चौथ्या चेंडूवर धाव घेण्याच्या प्रयत्नात धावबाद झाला. भारताला दोन चेंडूंवर दोन धावा करायच्या होत्या. पाचव्या चेंडूवर रिंकू सिंगने लेग साईडवर फटका खेळून धाव घेतली. एक धाव पूर्ण झाली आणि दुसऱ्या धावण्याच्या प्रयत्नात अर्शदीप सिंग धावबाद झाला.

पण सीन ॲबॉटच्या शेवटच्या चेंडूवर रिंकूने षटकार ठोकला. दुर्दैवाने ते रिंकूच्या खात्यात जमा झाले नाही. कारण ॲबॉटचा पाय खेळपट्टीच्या बाहेर होता आणि पंचांनी त्याला नोबॉल म्हटले होते. अशा परिस्थितीत भारताच्या खात्यात षटकार ऐवजी एक

धाव जमा झाली. आणि भारताने एक चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला. रिंकू सिंगने १४ चेंडूत २२ धावा केल्यानंतर नाबाद राहिला.

२०९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाचे दोन्ही सलामीवीर १५ चेंडूतच तंबूमध्ये परतले. ऋतुराज गायकवाड पहिल्याच षटकात खाते न उघडता धावबाद झाला. त्याला एका चेंडूचाही सामना करता आला नाही. तिसऱ्याच षटकात यशस्वी जैस्वाल तंबूमध्ये परतला. यशस्वीने आठ चेंडूत २१ धावा केल्या.

दोन गडी बाद झाल्यानंतर इशान किशन आणि सूर्यकुमार यांनी डावाची धुरा सांभाळली. दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी ११२ धावांची भागीदारी केली. सूर्यकुमारने ४२ चेंडूत ८० धावा केल्या. त्याने आपल्या खेळीत नऊ चौकार आणि चार षटकार मारले. इशान किशनने ३९ चेंडूत ५८ धावा केल्या. त्याने दोन चौकार आणि पाच षटकार मारले. तिलक वर्माने १२ आणि अक्षर पटेलने २ धावा केल्या. रवी बिश्नोई आणि अर्शदीप सिंग यांना खातेही उघडता आले नाही. मुकेश कुमार शून्यावर नाबाद राहिला. ऑस्ट्रेलियाकडून तन्वीर संघाने दोन बळी घेतले. जेसन बेहरेनडॉर्फ, मॅथ्यू शॉर्ट आणि सीन ॲबॉट यांनी प्रत्येकी एक फलंदाज बाद केला .

ऑस्ट्रेलियाकडून जोश इंग्लिशने शानदार शतक झळकावले. त्याने ५० चेंडूत ११० धावा केल्या. या काळात त्याने ११ चौकार आणि आठ षटकार मारले. त्याने स्टीव्ह स्मिथसोबत दुसऱ्या गड्यासाठी १३० धावांची भागीदारीही केली. स्मिथने ५२ धावांची खेळी खेळली. टीम डेव्हिडने नाबाद १९ धावा केल्या. मॅथ्यू शॉर्ट १३ धावा करून बाद झाला. मार्कस स्टॉइनिसने नाबाद सात धावा केल्या. भारताकडून प्रसिद्ध कृष्णा आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत सात्विक-चिरागची आगेकूच

। शिन्झेन । वृत्तसंस्था ।

भारताचा प्रमुख बॅडमिंटनपटू एच. एस. प्रणॉय, तसेच आशियाई सुवर्णपदक विजेती जोडी सात्विक साईराज रंकीरेड्डी व चिराग शेट्टी यांनी चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. चायना मास्टर्समध्ये पुरुष एकेरीत आव्हान कायम असलेला जागतिक कांस्यपदक विजेता प्रणॉय हा एकमेव भारतीय आहे. उपउपांत्यपूर्व लढतीत गुरुवारी त्याने ४० मिनिटांत डेन्मार्कच्या मॅग्नस जोहान्नसन याच्यावर २१-१२, २१-१८ असा विजय प्राप्त केला. या स्पर्धेत प्रणॉयला आठवे मानांकन आहे. अखेरच्या आठ खेळाडूंच्या फेरीत त्याच्यासमोर जपानच्या तृतीय मानांकित कोदाई नाराओका याचे आव्हान असेल.

पुरुष दुहेरीच्या जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानी असलेल्या सात्विक व चिराग यांना चायना मास्टर्समध्ये अव्वल मानांकन आहे. उपांत्यपूर्व फेरी गाठत त्यांनी दुहेरीतील भारताचे आव्हान कायम राखले. आगेकूच राखताना त्यांनी जपानच्या अकिरा कोगा व ताईची साईतो जोडीवर २१-१५, २१-१६ असा विजय मिळवला. पुढील फेरीत इंडोनेशियाची लिओ रॉली कार्नांडो व डॅनिएल मार्टिन जोडी सात्विक-चिराग जोडीची प्रतिस्पर्धी असेल.

पुरुष एकेरीत जोहान्नसनविरुद्ध प्रणॉयने शानदार सुरुवात केली. पहिल्या गेममध्ये त्याने ६-१ अशी मोठी आघाडी घेतली, नंतर डेन्मार्कच्या खेळाडूने पिछाडी ८-६ अशी कमी केली, नंतर १४-११ अशी स्थिती असताना भारतीय खेळाडूने सारा अनुभव पणाला लावत प्रतिस्पर्ध्याला दीर्घ साखळीमध्ये गुंतवले. जोहान्नसन दमल्याची संधी साधत प्रणॉयने पहिला गेम खिशात टाकला. दुसरा गेम जास्तच रंगतदार ठरला. दोन्ही खेळाडूंनी १५-१५ अशी बरोबरी साधली, नंतर प्रत्येकी १८ गुण असताना प्रणॉयने निर्णायक टप्प्यावर मुसंडी मारत उपांत्यपूर्व फेरीतील जागा निश्चित केली.

मुंबईचा सिक्कीमवर मोठा विजय

गोलंदाजांची प्रभावी कामगिरी

। अलूर । वृत्तसंस्था ।

अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या मुंबईने विजय हजारे करंडक राष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत सिक्कीम वर दणदणीत विजय मिळवून जोरदार सलामी दिली. सात गडी राखून विजय मिळवणाऱ्या मुंबईने ९० धावांचे लक्ष्य १२ षटकांत पार करून २२८ चेंडू राखून विजय मिळवताना सरासरी कमालीची उंचावली.

रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर, शिवम दुबे, शार्दुल ठाकूर, यशस्वी जयस्वाल आणि जखमी पृथ्वी शॉ अशा नावाजलेल्या

खेळाडूंविना खेळतानाही मुंबईने आपली ताकद दाखवली.

सिक्कीमने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली, परंतु पहिल्या षटकापासून त्यांची घसगुंडी सुरू झाली. या ८९ धावांत कर्णधार नीलेश लामिचानेच्या २९ आणि अवांतर १६ धावांचा समावेश आहे. त्यांच्या इतर सर्व फलंदाजांनी केवळ हजेरी लावण्याचे काम केले.

झटपट विजयाचे उद्दिष्ट ठेवून फलंदाजीस उतरणाऱ्या मुंबईला अंगरीश रघुवंशी आणि जय बिश्त यांनी जोरदार सलामी दिली, परंतु त्यापैकी एकाला अर्धशतक करता आले नाही. विजयावर शिक्कामोर्तब करण्यासाठी अजिंक्य रहाणेला मैदानात यावे लागले. मुंबईचा दुसरा सामना केरळविरुद्ध २५ तारखेला होणार आहे.

दिल्लीत 'खेलो इंडिया पॅरा गेम्स' स्पर्धा

। कोल्हापूर । वृत्तसंस्था ।

यंदा प्रथमच होत असलेल्या 'खेलो इंडिया पॅरा गेम्स'मधून पॅरा खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळणार आहे. राष्ट्रीय स्तरावर विविध क्रीडा प्रकारांत पॅरा-ॲथलेट स्पर्धा होत आहे.

येत्या डिसेंबरमध्ये सात क्रीडा प्रकारांत स्पर्धा रंगणार असून, पॅरा खेळाडूंत त्याची उत्सुकता आहे. दिल्लीतील जवाहरलाल नेहरू व इंदिरा गांधी स्टेडियमसह डॉ. कर्णीसिंग शुटिंग रेंजवर स्पर्धा होणार आहेत.

केंद्रीय क्रीडा मंत्रालय, स्पोर्टस ॲथोरिटी ऑफ इंडिया, नॅशनल स्पोर्टस फेडरेशन, पॅरालिंपिक कमिटी ऑफ इंडिया, सेरेबल पाल्सी स्पोर्टस फेडरेशन



ऑफ इंडियाच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा होत आहे. 'खेलो इंडिया' स्पर्धेप्रमाणे पॅरा खेळाडूंमधून उत्कृष्ट खेळाडू शोधता यावेत, त्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचा अनुभव मिळावा, क्रीडा करियरवर त्यांनी लक्ष केंद्रीत करावे, हा यामागचा हेतू आहे.

पॅरा आशियाई, पॅरा कॉमनवेल्थ, पॅरालिंपिक स्पर्धेमध्ये सहभागी झाल्यानंतर खेळाडूंचा कस लागतो. अनेक आव्हानांचा सामना करत त्यांना पदके मिळवावी लागतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध देशांच्या खेळाडूंच्या तुलनेत त्यांचा अनुभव तोकडा पडतो. त्यावर इलाज म्हणून पॅरा खेळाडूंना ही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेची भेट क्रीडा मंत्रालयाने दिली आहे.

देशाला आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांत पॅरा खेळाडूंकडून खूप अपेक्षा आहेत. त्यांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने यंदा सात क्रीडा प्रकार निवडण्यात आले आहेत. त्यांच्या येण्या-जाण्यासह जेवण, निवासाचा खर्च केला जाणार आहे. विजेत्यांना पाच लाख रूपये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

असे असणार क्रीडा प्रकार

धनुर्विद्या, ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, सीपी-फुटबॉल, शुटिंग, टेबल-टेनिस, पॉवरलिफ्टिंग

'खेळपट्टीचा अभ्यास आणि अचूक रणनीतीचा ऑस्ट्रेलियाला फायदा'

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

खेळपट्टीचा एकदम अचूक अभ्यास आणि तेवढेच अचूक डावपेच याची सांगड घातल्यामुळेच ऑस्ट्रेलियाने एकदिवसीय विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात आम्हाला चीतपट केले, अशी माहिती भारतीय संघात असलेला फिरकीपटू आर. अश्विनने उघड केली.

हा अंतिम सामना असल्यामुळे ऑस्ट्रेलियाने अचूक डावपेचांची तटबंदी तयार केली आणि भारतीय संघाला सतत धावसंख्येपासून मागे ठेवले होते.

स्पर्धेतील दहाही सामन्यात जबरदस्त फलंदाजी करणाऱ्या भारताला या अंतिम सामन्यात जेमतेम २४० धावा करू दिल्या आणि त्यानंतर हे आव्हान सहज पार करून ऑस्ट्रेलियाने सहावे विजतेपद मिळवले. त्यामुळे त्यांची अफाट रणनीती कारणीभूत होती. असे अश्विन म्हणाला.

अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकल्यानंतर ऑस्ट्रेलियाने प्रथम गोलंदाजी स्वीकारली, हा निर्णय सर्वांना आश्चर्यकारक वाटला असला, तरी त्यामागे ऑस्ट्रेलियाचा अभ्यास किती खोलवर होता याची उकल मला नंतर झाली, असे अश्विनने सांगितले.

भारताचा डाव संपल्यानंतर माझी ऑस्ट्रेलिया निवड समितीचे अध्यक्ष जॉर्ज बेली यांच्याशी भेट झाली. नाणेफेक जिंकल्यावर तुम्ही प्रथम गोलंदाजी का स्वीकारली, हा प्रश्न मी त्यांना विचारला. त्यावर त्यांनी दिलेले उत्तर आपल्याला थक्क करणारे होते, असे अश्विनने म्हणाला.

बेली म्हणतात, आमचे खेळाडू भारतात अनेक वर्षे आयपीएल खेळत आहेत. येथे आम्ही अनेक द्विपक्षीय मालिकाही खेळलेलो आहोत. त्यामुळे खेळपट्ट्यांचे स्वरूप आम्ही जवळून ओळखतो.

ऑस्ट्रेलियाची रणनीती आणि गोलंदाजी करताना क्षेत्ररक्षण व्यूहरचना अश्विन कपडे बदलण्याच्या खोलीमध्ये बसून पाहत होता. तो म्हणतो, कमिम्सने तर फिरकीसाठी असलेले क्षेत्ररक्षण स्वतः गोलंदाजी करताना लावले होते.

मिड ऑफची जागा रिकामी ठेवली आणि ४ लेग साईडला आणि ५ ऑफसाईडला क्षेत्ररक्षक उभे केले होते. वेगवान गोलंदाजासाठी असे क्षेत्ररक्षण मी अगोदर पाहिले नव्हते, असे अश्विनने सांगितले.

आयटीएफ टेनिस स्पर्धा

एकेरीत चार भारतीय खेळाडू उपांत्यपूर्व फेरीत

। मुंबई । वृत्तसंस्था ।

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना (एमएसएलटीए) यांच्या वतीने एमएसएलटीए २५ हजार डॉलर पुरुष आयटीएफ टेनिस स्पर्धेत मुख्य सोडतीच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत रामकुमार रामनाथन, सिद्धार्थ विश्वकर्मा, एसडी प्रज्वल देव आणि सिद्धार्थ रावत या चार भारतीय खेळाडूंनी विजयी मालिका कायम ठेवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

जीए रानडे टेनिस कोर्ट या ठिकाणी सुरु असलेल्या या स्पर्धेत एकेरीत मुख्य सोडतीमध्ये उप-उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या तिसऱ्या मानांकित रामकुमार रामनाथन याने देव जावीयाचा ६-३, ६-४ असा पराभव करून विजयी घौडदौड कायम राखली. संघर्षपूर्ण लढतीत भारताच्या सिद्धार्थ

विश्वकर्मा याने जपानच्या योंतारो तागुचीचा टायब्रेकमध्ये ६-७(२), ७-६(३), ६-२ असा पराभव करून आपले आव्हान कायम राखले. सिद्धार्थ रावतने वाईल्ड कार्डद्वारे प्रवेश केलेल्या राघव जयसिंघानीचा ६-२, ६-२ असा सहज पराभव करून उपांत्यपूर्व फेरी गाठली.

अव्वल मानांकित रशियाच्या एव्हेग्नी डोन्स्कॉयने क्वालिफायर भारताच्या आर्यन शहाचे आव्हान ६-२, ६-१ असे संपुष्टात आणले. सातव्या मानांकित एस डी प्रज्वल देव याने सिद्धांत बांठियाला ६-३, ६-४ असे पराभूत केले. जर्मनीच्या दुसऱ्या मानांकित लुई वेसेल्स याने जपानच्या युइचिरो इनुईचा ६-४, ७-६(०) असा पराभव करून आगेकूच केली. अमेरिकेच्या हॅरिसन ॲडम्स याने ऑस्ट्रियाच्या आठव्या मानांकित डेव्हिड पिचलरचा ६-३, ६-४ असा पराभव करून पुढच्या फेरीत आपले स्थान निश्चित केले.

साडेतीनशे धावा करूनही महाराष्ट्राची सलामीला हार

। जयपूर । वृत्तसंस्था ।
तब्बल ३५५ धावांचा डोंगर उभा करूनही महाराष्ट्राला विजय हजारे राष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत झारखंडकडून पराभव सहन करावा लागला. विराट सिंगची झंझावाती १४३ धावांची खेळी महाराष्ट्राच्या प्रयत्नांवर पाणी फेरणारी ठरली.

विशेष म्हणजे झारखंडने विजयाचे ३५६ धावांचे आव्हान दोन षटके राखून पार केले. २ बाद १७ अशा अवस्थेनंतर झारखंडने ही विजयी झेप घेतली. प्रथम फलंदाजीत महाराष्ट्राने ३५५ धावा केल्यावर त्यांचा विजय सोपा वाटत होता; परंतु चित्र बदलत गेले.

महाराष्ट्राकडून अंकित बावणेने नाबाद १०७ धावा केल्या; परंतु त्यासाठी त्याने १०० चेंडू घेतले. याच वेळी प्रतिस्पर्धी झारखंड संघातील विराट सिंगने ११६ चेंडूत १४३ धावांची खेळी साकार केली. दोन्ही संघातील हा फरक निर्णायक ठरला. महाराष्ट्राकडून ओम भोसलेने ७१ चेंडूत ७३, केदार जाधव ५० चेंडूत ५५ यांनी अर्धशतके केली असली, तरी त्यांची धावगती मोठी नव्हती.

संक्षिप्त धावफलक - महाराष्ट्र ५० षटकांत ४ बाद ३५५ (ओम भोसले ७३ - ७१ चेंडू, १२ चौकार, १ षटकार, नौशाद शेख ३२, केदार जाधव ५५ - ५० चेंडू, ७ चौकार, अंकित बावणे नाबाद १०७ - १०० चेंडू, ८ चौकार, ३ षटकार, अझिम काझी ६१ - ४१ चेंडू, ५ चौकार, ४ षटकार, अवांतर २४, वरुण ॲरॉन ५२-२, शाबाझ नदीम ७१-१)पराभूत वि. झारखंड - ४८ षटकांत ४ बाद ३५९ (विराट सिंग १४३ - ११६ चेंडू, १६ चौकार, ४ षटकार, विनायक विक्रम ५३, सौरभ तिवारी नाबाद ७० - ६४ चेंडू, ६ चौकार, २ षटकार,

कुमार कुशाग्रा नाबाद ६७ - ३६ चेंडू, ४ चौकार, ५ षटकार, प्रदीप दाधे ४७-२, प्रशांत सोलंकी ६९-२)

केरळचा सौराष्ट्रला धक्का

केरळ संघाने गतविजेत्या सौराष्ट्र संघाला सलामीलाच धक्का देताना तीन गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या सौराष्ट्रचा डाव १८५ धावांत संपुष्टात आला. यात विश्वराजसिंह जडेजाने ९८ धावांची खेळी केली. केरळकडून अकहिनने चार; तर बासिल थंपी आणि श्रेयस गोपाल यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले . हे माफक आव्हान पार करताना केरळचीही ४ बाद ६१ अशी घसरगुंडी उडाली होती. संजू सॅमसन ३० धावाच करू शकला.

संक्षिप्त धावफलक

सिक्कीम ३८.१ षटकांत ८९ (नीलेश लामिचाने २९, तुषार देशपांडे ७-१-१९-३, मोहित अवस्थी ७-३-९-२, अर्थव अंकोलेकर ६-३-१३-२) पराभूत वि. मुंबई : १२ षटकांत ३ बाद ९० (अंकरिष रघुवंशी ३०- २८ चेंडू, ४ चौकार, जय बिश्त २८- २२ चेंडू, ४ चौकार, १ षटकार, अजिंक्य रहाणे नाबाद १५)

थंडीपासून बचाव करताना...

मुलांनो, आता थंडीचे दिवस सुरू झाले आहेत. रात्री आणि पहाटेच्या वेळी हवेत गारवा जाणवू लागला आहे. लवकरच वातावरण आणखी बदलेल आणि दिवसभर थंडगार वाऱ्यांचा प्रभाव दिसून येईल. अशा वेळी आरोग्याची विशेष काळजी घ्यायला हवी. मुख्य म्हणजे थंडीपासून बचाव करण्यासाठी अंगभर उबदार कपडे घालण्याचा कंटाळा करु नका, कारण ही काळजी घेतली नाही तर तुम्हाला थंडीचा त्रास होऊ शकतो. मात्र त्यासाठी अंगावर एकावर एक कपडे चढवण्याची आवश्यकता नाही. कपड्यांचे दोन लेअर थंडीपासून तुमचे संरक्षण करण्यास पुरेसे आहेत. त्यातील पहिला लेअर सुती कपड्यांचा असावा तर दुसरा लोकरीच्या कपड्यांचा असावा. मात्र मुलांनो, लक्षात ठेवा... कधीही थेट स्वेटर घालू नका कारण लोकरीच्या थेट स्पर्श झाल्यास अंग खाजण्याचा, रॅश येण्याचा धोका असतो. कधीही मळकट, खूप जुने स्वेटर वापरु नका. त्याचाही त्रास होण्याची शक्यता असते.

आवळा खा, पण...

- थंडीच्या या दिवसांमध्येच नव्हे तर एरवीदेखील आवळ्याचे सेवन लाभकारक ठरते. मात्र या दिवसांमध्ये बाजारात आवळ्यांची आवक वाढते आणि ते सहज उपलब्ध होतात. म्हणूनच

आहारात आवळ्यांचे प्रमाण वाढवण्याचा प्रयत्न करा. आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात असल्यामुळे अनेक लाभ मिळतात. मात्र काही त्रास वा आजार असल्यास आवळा न खाण्याचा सल्ला दिला जातो. म्हणूनच त्याचीही माहिती घ्यायला हवी. उदाहरणार्थ, कोणतीही शस्त्रक्रिया झालेली असल्यास अशा लोकांनी आवळा खाऊ नये, असे तज्ज्ञ सांगतात. त्वचा कोरडे असल्यासही आवळा न खाण्याचा सल्ला दिला जातो कारण यामुळे ही समस्या वाढू शकते. एखाद्या आजारावर उपचार म्हणून काही औषधे सुरू असणाऱ्यांनीही आवळ्याचे सेवन करु नये. महत्त्वाचे म्हणजे रक्ताशी संबंधित काही समस्या असणाऱ्यांनीही अधिक प्रमाणात आवळा खाता कामा नये.

लवकर उठायचे आहे?

- मुलांनो, थंडीच्या दिवसात उशीरापर्यंत झोपण्याची मजाच काही वेगळी असते ना? मात्र शाळा, अभ्यास, क्लाससाठी लवकर उठावेच लागते. पण अलार्म लावूनही काही मुलांना जाग येत नाही. चला तर मग,अलार्म न लावताही लवकर जाग येण्यासाठी काही उपाय योजता येतात का ते पाहू या.
- लवकर जाग येण्यासाठी रात्री हलका आहार घ्या. शिवाय झोपताना गरम दूध घेण्याचा सराव ठेवा. यामुळे पचन उत्तम होते आणि शांत झोप लागून पहाटे जागही लवकर येते.
- लवकर झोपण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी अभ्यास वा अन्य कामे वेळेत पूर्ण करा. तुम्हाला मोबाईल बघण्याची वा गेम खेळण्याची सवय असेल तर ती त्वरित बदला कारण यामुळे झोपेत व्यत्यय येतो. लवकर जाग येण्यासाठी व्यायामाचीही मोठी मदत होते. सायकलिंग, मॉर्निंग वॉक यासारख्या सवयी तुम्हाला लवकर जागे करतात.

चित्र रंगवा

इंटरनेट होतेय गतिमान

टेक्नोजगत...

इंटरनेटची गती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. आधी टूजी, मग थ्रीजी आणि आता फोरजी तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. लवकरच फाईव्हजी तंत्रज्ञान येणार आहे. इंटरनेटचा वाढता वापर लक्षात घेता या क्षेत्रात नवनवे शोध लागत आहेत. पुढच्या काळात आपण वेगवान इंटरनेटचा अनुभव घेऊ शकतो. इतकंच नाही, तर एलईडी बल्बचा वापर इंटरनेट मिळवण्यासाठी करता येऊ शकतो. लायफाय तंत्रज्ञानामुळे हे शक्य होणार आहे. हे तंत्रज्ञान ४०० ते ८०० टीएचझेड दरम्यानच्या दृष्यात्मक प्रकाशाचा वापर करतं. बल्ब चालू किंवा बंद करून लायफायचा वापर करता येईल.

हे सगळं काही नॅनोसेकंदांमध्ये घडणार आहे. त्यामुळे उघड्या डोळ्यांनी आपण हे पाहू शकणार नाही. लायफाय तंत्रज्ञान वायफायची जागा घेणार नाही. डाटाची देवाणघेवाण करण्यासाठी हे तंत्रज्ञान प्रकाशाचा वापर करतं. प्रकाशाची किरणं भिंतीच्या आरपार जाऊ शकत नाहीत. त्यामुळे हे तंत्रज्ञान बंदिस्त खोलीत वापरता येणार आहे. या तंत्रज्ञानामुळे प्रतिसेकंद १० जीबी इतका डाटा ट्रान्सफर करणं शक्य होणार आहे. हा प्रकल्प यशस्वी होण्यासाठी आपण आशा करू शकतो.

मातीला हात द्या

मित्रांनो, दिवाळीत तुमच्यापैकी अनेकांनी किल्ले केले असतील. त्यानिमित्ताने माती तयार करण्यात बराच वेळ घालवला असेल. मातीत खेळण्याचा आनंद लुटला असेल. तर मग आताही मातीचा हात सोडू नका कारण कुंडीतील माती बदलण्याची वेळ आलीच आहे. साधारणपणे पावसानंतर कुंडीतली जुनी माती बदलल्याने रुपांची जोमाने वाढ होते. नवीन मातीच्या गुणवत्तेमुळे झाडांना अधिक पोषक तत्वे मिळतात. म्हणूनच झाडे अनेक महिन्यांपर्यंत वाढत नसतील किंवा त्यांची वाढ दिसून येत नसेल तर झाडाची माती बदलणे चांगले.कुंडीतील माती बदलणार असाल तर काही काळजी घ्या. पहिली बाब म्हणजे मातीची निवड योग्य असावी. झाडाची माती बदलताना पोषक तत्त्वांनी युक्त तसेच चांगला निचरा होणारी माती वापरा. यामुळे रोपाची वाढ योग्य प्रकारे होते. माती वालुकामय असेल तर ती झाडाच्या मुळांना भरपूर हवा

देईल. परंतु, वालुकामय माती लवकर ओलावा आणि पोषक घटक गमावते. म्हणूनच त्यात शेणखत आणि गांडूळ खत घाला. चिकणमाती असेल तर ती अधिक प्रमाणात ओलावा टिकवून ठेवते. मात्र या मातीचे बारीक कण एकमेकांना चिकटून राहत असल्यामुळे पाणी आणि हवा मुळांपर्यंत पोहोचण्यासाठी कमी जागा राहते. त्यामुळे झाडांची वाढ खुंटते आणि झाडही मरते. त्यामुळे अशी माती वापरत असाल तर त्यात आधी वाळू आणि सेंद्रिय खत मिसळा. मुलांनो, माती तयार करताना ताज्या शेणाचा वापर करू नका कारण ते झाडांना हानी पोहोचवू शकते. यामुळे सूक्ष्मजंतूंची संख्या वाढते.माती तयार करताना नायट्रोजनचा चांगला स्रोत म्हणून तुम्ही फ्लॅक्ससीड केक, बोनमील आणि कडुनिंबाच्या केकची पावडर वापरु शकता. हे घटक मातीमध्ये मिसळले तर रोपांची उत्तम वाढ होईल. हा काळ गुलाबाच्या रोपांची कापणी आणि छाटणी करण्याचा आहे. त्यानंतरच गुलाबाची माती बदलली पाहिजे. सर्वप्रथम भांड्यातून जुनी माती काढा. त्यानंतर माती, शेणखत, गांडुळ खत आणि वाळू यांचे मिश्रण तयार करा आणि कुंडीत घाला.

प्राणी म्हातारे होताना..

तुम्हा मुलांना पाळीव प्राणी खूप आवडतात. हट्टाने तुम्ही घरामध्ये आवडते प्राणी आणताही. मात्र त्यांच्या स्वास्थ्याची काळजी घेणे, त्यांच्याकडे लक्ष देणे हे देखील आपले कर्तव्य असते. उदाहरणार्थ, आपण त्यांच्या वाढत्या वयाचा विचारही करायला हवा. समजा घरात कुत्रे असेल तर त्याच्या वाढत्या वयाचा विचार करणे गरजेचे असते कारण वयानुसार त्याच्या गरजाही बदलतात.

वयातील बदल हळूहळू होत असतात, त्यामुळे सुरुवातीला तुम्हाला ते कळणार नाही. म्हणूनच पाळीव प्राण्यांच्या वृद्धत्वाची काही चिन्हे जाणून घ्यायला हवी. मुलांनो, साधारणपणे आठ ते १० वर्षे वय असलेल्या प्राण्यांमध्ये वृद्धत्वाची लक्षणे दिसतात. त्यांच्या डोके आणि तोंडावर पांढरी झाक येते. त्यांची ऐकण्याची आणि पाहण्याची क्षमता कमी होते. अशावेळी पाळीव प्राणी जवळपासच्या वस्तूंवर आदळू शकतात किंवा त्यांना वस्तू ओळखण्यात अडचण येऊ शकते. त्यांना लघवी आणि शौचास त्रास होऊ शकतो. बरेचदा ते असतील तिथेच लघवी करतात. त्यांच्या झोपेचे प्रमाण वाढते.

पाळीव प्राण्याचे वजन कमी होणे हा स्नायूंच्या कमकुवतपणाचा परिणाम असू शकतो, जो वृद्ध पाळीव प्राण्यांमध्ये सामान्य आहे. त्यामुळे आपल्या पाळीव प्राण्याचे वजन



कमी होत असल्यास पशुवैद्याचा सल्ला घ्या. वाढत्या वयामुळे कुत्र्यासारख्या प्राण्याला पायऱ्या चढण्यात किंवा कारमधून उडी मारण्यात अडचण येऊ शकते. मागच्या पायांमध्ये अशक्तपणा दिसू शकतो. असे जाणवल्यास हालचालीतील समस्या कमी करण्यासाठी पाळीव प्राण्याच्या दैनंदिन दिनचर्यामध्ये सौम्य व्यायाम आणि थोडे चालणे याचा समावेश करा. पाळीव प्राण्यांमध्ये कोणत्याही वयात श्वासाची दुर्गंधी येऊ शकत असली तरी वाढत्या वयात ही समस्या वाढते. म्हणूनच तुमच्या पाळीव प्राण्याच्या तोंडाला वा अंगाला उग्र वास येत असेल तर वेळीच त्यांना डॉक्टरांकडे दाखवून आणा.

रहा फीट



ठिपके जोडा

विजेशी खेळ नको

मित्रांनो, आपण अपघाताच्या अनेक बातम्या वाचतो. त्यातील काही विजेचा धक्का लागल्याने गंभीर इजा झाल्याचेही असतात. हा धोका लक्षात घेऊन तुम्हा मुलांनी काही काळजी घ्यायलाच हवी.

साधारणपणे १२ वर्षाखालील मुलांना घरामध्ये विजेचा धक्का बसण्याचा धोका जास्त असतो. जमिनीवर गुडघे टेकून चालणे, कशालाही स्पर्श करणे, उघड्या तारांशी खेळणे, तोंडात प्लग घालणे या सवयी अशा अपघातांना आमंत्रण देऊ शकतात. म्हणूनच हा धोका टाळण्यासाठी काही गोष्टींमुळे विजेचा धक्का बसू शकतो आणि त्यांच्यापासून दूर राहायला हवे हे जाणून घ्या. महत्त्वाचे म्हणजे इलेक्ट्रिक शॉक का लागतो यामागील शास्त्र समजून घ्या. आपण ऐकले आहे की सर्व वस्तू अणूपासून

बनतात. अणू तीन गोष्टींनी बनलेला असतो. इलेक्ट्रॉन, प्रोटॉन आणि न्यूट्रॉन. या इलेक्ट्रॉनमध्ये ऋण शुल्क आहे.चांगल्या कंडक्टर असणाऱ्या गोष्टी इलेक्ट्रॉन सहज बाहेर जाऊ देत नाहीत. त्यामुळे अणूमध्ये इलेक्ट्रॉन धावत राहतात आणि त्या वस्तूमध्ये विद्युत प्रवाहही चालू राहतो. मात्र ज्या गोष्टी विजेचे खराब वाहक आहेत त्या इलेक्ट्रॉन बाहेर जाण्यापासून रोखू शकत नाहीत. त्यामुळे अनेक वेळा त्यात इलेक्ट्रॉन जमा होतात. एखाद्या वस्तूतील इलेक्ट्रॉन्सची संख्या वाढते तेव्हा त्यातील ऋणभार देखील वाढते. मग कोणतीही व्यक्ती अशा वस्तूला स्पर्श करते तेव्हा त्याच्या शरीरातील इलेक्ट्रॉन्स समोरील वस्तूमधील इलेक्ट्रॉनला आकर्षित करू लागतात. या इलेक्ट्रॉनच्या उच्च गतीमुळे विद्युतप्रवाह तयार होतो आणि व्यक्ती त्या वस्तूकडे खेचली जाते. स्पर्श केल्यानंतर हीच प्रक्रिया होत असल्यामुळे वीज अंगात उतरते आणि धक्का लागून अपघात घडतो.

प्राणीजगत...

आफ्रिकन जंगली श्वान

जगभरात कुत्र्यांच्या अनेक प्रजाती आहेत. त्यांच्या दिसण्यावरून आणि सवयींवरून या कुत्र्यांचे वर्गीकरण केले जाते. अशीच एक जंगली कुत्र्यांची प्रजाती आफ्रिका देशामध्ये आढळते. हे कुत्रे लांडग्यांसारखे दिसतात. हा प्राणी खूप हुशार आणि समाजप्रेमी असतो. त्यांची शेपूट झुबकेदार असते. त्याचा आकार मध्यम आकाराच्या कुत्र्यांएवढा असतो. हे प्राणी एकमेकांसोबत मिळून-मिसळून राहतात. ते आजारी, गरीब प्राण्यांना खातात. यामुळे पर्यावरणाचं संतुलन राखलं जातं. हे पर्यावरणासाठी उपयुक्त असे प्राणी आहेत.

झटपट

गाजराची कोशिंबीर

मित्रांनो, सध्या गाजरांचा हंगाम आहे. बाजारात छान लालचुटुक गाजरं मिळतात. गाजरांपासून तसे अनेक पदार्थ बनवता येतात. गाजराचा हलवा छान लागतो, पण तुम्हाला करायला अवघड जाऊ शकतो. त्यापेक्षा या गाजरांपासून तुम्ही गाजराची कोशिंबिर बनवू शकता. यासाठी तीन ते चार गाजरं, पाव कप बेदाणे, एक चमचा मेयॉनिज, ३ टेबलस्पून दही हे साहित्य घ्या. गाजर किसून घ्या. किसलेलं गाजर एका बाउलमध्ये ठेवा. त्यात बेदाणे घाला. आता मायोनिज आणि दही घालून नीट हलवून घ्या. चवीला मीठ घाला. हवं असेल तर थोडं तिखट घालता येईल. कांदा, टोमॅटो, कोबी अशा भाज्याही त्यात घालता येतील.

काळजी घ्या

टॅटू काढताना...

छोट्या दोस्तांनो, टॅटूबद्दल अनेकांना आकर्षण असतं. तुम्ही मुलंही कधी तरी टॅटू काढून घेता. पण या टॅटूमुळे बरंच नुकसान होऊ शकतं. त्यातच परमनंट टॅटू काढलात तर त्वचेचे विकार होऊ शकतात. टॅटू काढल्यानंतर साधारण वर्षभर तुम्हाला रक्तदान करता येत नाही. तसंच अंगावर सूज आणि पुरळ येऊ शकतं. जंतूसंसर्ग होण्याचीही शक्यता वाढते. टॅटू काढल्यानंतर स्नायूंमध्ये वेदना जाणवू शकतात. त्यामुळे रस्त्यावरून किंवा एखाद्या जत्रेत गेल्यावर पूर्ण विश्वास असल्याशिवाय कधीही टॅटू काढू नका. तसंच परमनंट टॅटू काढण्याआधी तुमच्या त्वचारोगतज्ज्ञाचा सल्ला घ्या.

आरोग्यवर्धक

जालंधर बंध

हल्लीची धकाधकीची जीवनशैली बघता तुम्हा मुलांनी शरीरातला रक्तप्रवाह सुरळीत सुरू राहण्यासाठी लहानपणापासूनच विशेष प्रयत्न करायला हवेत. त्यासाठी आसनांचा आधार घेता येईल. आसनांपैकी जालंधर बंध हा प्रकार करता येईल. यासाठी मान खाली करून हनुवटी गळ्यामध्ये घट्ट दाबून धरा. यामुळे सुषुम्ना ही नाडी कार्यरत होते. यामुळे डोक्यातल्या वरच्या भागात असलेल्या पीनियल नामक ग्रंथींचं काम सुरू होतं. यामुळे हार्मोन्सचा स्राव वाढतो. हे हार्मोन्स हृदयापर्यंत पोहोचतात आणि रक्ताभिसरणाची क्रिया सुधारते.

कलासक्त

शीतल छाया भूतल व्यापक तू कैसी...

लहानपणी वाईट स्वप्न पडलं की आई म्हणायची, तुळशीला सांगून दे. तिला सांगितलं की मन हलकं व्हायचं. पूर्वी तिच्याजवळ दिवा लावण्याच्या, प्रदक्षिणेच्या निमित्ताने सगळ्याच स्त्रिया मन मोकळं करत असाव्यात. स्वतःची आणि इतरांची दुःखं पचवूनही, दर वर्षी बोहल्यावर चढूनही, ती आपल्यावर उपकार करण्यात तसूभरही कमी पडत नाही. तिचं उतराई होण्यासाठी काय करायला पाहिजे हा विचार आता करायलाच हवा.

डॉ. साधना कुलकर्णी

मध्यंतरी अंगणातला बगीचा साफसूफ करण्यासाठी एक माळी जोडपं आलं होतं. संपूर्ण बगीचा त्यांनी व्यवस्थित, नीटनेटका केला पण इकडे तिकडे कशीही वाढलेली तुळशीची झाडे त्यांनी तशीच ठेवली होती. त्याबद्दल हटकलं तर ती बाई म्हणाली, 'माऊलीला नाई तोडत आमी. देवी हाय ती. तुमच्या दारी आली ना ती, मंग राहू द्या नं तिले. रायचं तितके दीस राहील ती.' असं म्हणून तुळशीला हात जोडून ती दोघं निघून गेली.

का कुणास ठाऊक पण त्यांच्या बोलण्याचा माझ्यावर विलक्षण प्रभाव पडला. मला माझीच लाज वाटली. त्यांच्या प्रगाढ श्रद्धेचा मला हेवा वाटला. एक तुळशीवृंदावन पुरेसं आहे की रोज पाणी घालायला आणि दिवा लावायला... इतपतच माझी भूमिका कम श्रद्धा होती. पण आत खोलवर मला खूप हलवून गेलं त्यांचं बोलणं. मी राहू दिली तशीच ती झाडं... आणि नुकतीच बातमी आली की महाराष्ट्रात प्रदूषणाचं प्रमाण कमालीचं वाढलंय आणि त्यामुळे नागरिकांना मास्क घालण्याचं आवाहन केलं गेलं आहे. मला एकदम तुळस आणि पर्यावरणरक्षण यांचा संबंध आठवला. तुळशीला नैसर्गिक हवा शुद्धीकारक समजलं जातं. दिवसातून बारा तास तुळस ऑक्सिजन सोडत असते आणि वातावरणातील कार्बन डायॉक्साईड, कार्बन मोनॉक्साईड, सल्फर डायॉक्साईड हे घातक वायू शोषून घेत असते. तसेच तिच्यात असलेले यूजेनॉल हे संयुग डास, कीटकांना दूर ठेवते. त्यामुळेच तुळस प्रत्येकाच्या घरासमोर असते. भारतीय संस्कृतीत तुळशीला पवित्र मानण्याचं कारण पर्यावरणाशी संबंधित असावं का? कारण आपले पूर्वज वैज्ञानिक बाबींवर अत्यंत खुबीने धार्मिकतेचे पांघरूण घालून आपल्याकडून योग्य ते करवून घेण्यात तरबेज होते.

पौराणिक कथा बघितल्यास, तुळशीच्या उत्पत्तीच्या अनेक कथा आढळतात. प्राधान्याने त्यात तुळशीच्या वाट्याला दुःखच आले आहे. कथा आणि कथानायक वेगवेगळे आहेत पण तुळशीची वेदना मात्र तशीच आहे. कसल्या ना कसल्या व्यथेपोटीच तुळशीची उत्पत्ती झाली आहे. पतीच्या आधी भोजन केले म्हणून एका ऋषी पत्नीला राक्षसीण होण्याचा शाप भोगावा लागला. या राक्षसी अवतारात ती ऋषी पत्नी अनेक वर्षं जगत राहिली. सुटकेची वाट बघत आयुष्य कंठत राहिली. अखेर एका भक्ताने केलेले कृष्णाचे नामस्मरण ऐकून तिला मृत्यू आला. पण तिचा देह तब्बल वर्षभर जळतच राहिला. शंकर-पार्वतीने ही चिता बघितली तेव्हा ते स्तिमित झाले. मृतावस्थेतही ही इतकी शोभायमान आहे. 'मृता लसती-सा एव तुलसी' अशी ही तुलसी आहे. म्हणून त्यांनी तिला स्पर्श केला आणि ती कार्तिक महिन्याच्या अमावस्येला प्रातःकाळी भूतलावर उगवली. भगवान विष्णूने तिला वर दिला की तुळशीशिवाय माझी पूजा संपूर्ण होणार नाही. तुळशीला मिळालेल्या या मोठेपणामागे तिने सोसलेल्या दुःखाचा डोह जाणवल्याशिवाय राहत नाही.

दुसऱ्या कथेत तर या तुळशीचा उपयोग देवांनी करून घेतलेला आढळतो. वृंदा नावाच्या राजकन्येचा पती जालंधर प्रचंड शक्तिमान होता. त्याच्यापासून देवांना धोका निर्माण झाला होता. देवांनी कपटाने जालंधरच्या शरीराचे हुबेहुब दोन तुकडे करून वृंदेला दाखवले. वृंदा शोकसागरात बुडून गेली. मग देवांनीच साधू वेष घेऊन जालंधरला जिवंत करण्याचे नाटक केले. हा जालंधर म्हणजे भगवान विष्णूच होते. भोळी वृंदा आनंदली. प्रेमभराने तिने जालंधरला मिठी मारली. देवांचं कपट तिच्या लक्षात आलं नाही. आपल्या पतीशी पूर्ण एकनिष्ठ असलेली वृंदा परपुरुषाच्या स्पर्शामुळे भ्रष्ट तर झालीच पण खऱ्याखुऱ्या जालंधराने तिला हे कृत्य करताना बघितले. जालंधर क्रुद्ध झाला. भ्रष्ट झाल्यामुळे वृंदेची पुण्याई संपली आणि खरा जालंधर मरण पावला. संताप आणि दुःखाने वृंदेने विष्णूला शाप दिला. तिच्या शापामुळे भगवान विष्णू अस्वस्थ झाले. त्यामुळे देवांनी भगवान विष्णूंसाठी भूतलावर तुळस लावली. तिलाच वृंदा किंवा विष्णुप्रिया म्हणतात.

अशा अनेक कथा पुराणात सांगितल्या आहेत. स्त्रीरुपात भोगलेली अपरिमित दुःखे आणि परिणामी निर्माण झालेली तुळस हे सगळ्या कथांचे सार. म्हणूनच तुळस आणि वेदनेचं अतूट नातं आहे. या कथा वाचताना आणि तुळशीची वेदना समजून घेताना प्रसिद्ध लेखिका दुर्गा भागवत यांच्या 'निसर्गोत्सव' या पुस्तकाची प्रकर्षाने आठवण आली. तुळशीबद्दल त्या लिहितात, 'अगदी साधी ही

तुळस. कधीच डोळ्यात न भरणारी. झाडाची नैसर्गिक शोभा एवढीच की ते नाजूक आहे. मंजिऱ्या तर विचारूच नका. निळी- जांभळी अशी ती अर्धी देठाच्या संपुटात लपलेली फुले- त्यांचा गंधही वाऱ्यावर पारिजातकाप्रमाणे भिरभिरणारा नाही. झाडाची सळसळ नाही. काही नाही. ना या झाडावर भुंगे झेपावत की पाखरे घरकुल करीत. मग असे काय मनोवेधक या तुळशीच्या रोपट्यात आहे? हातात खुडून घेतले तरच त्याचा गंध येतो. आणि हा गंध मात्र जागच्या जागी बसणारा असला तरी हृद्य असतो, मादक नसतो. मंजिरीतले प्रत्येक फूल न्याहाळले तर थरथरलेले दिसते. लाजेने लपलेले वाटते. प्रत्येक उमललेले फुल अतिनाजुक आणि निखोड रंगछटांनी नटलेले असते. घरातल्या वृंदावनाचे सोडा, रोपही एरवी कधी एकटे दुकटे नसते. त्याचे बी किती काळेभोर आणि सुंदर असते. वाऱ्याच्या लहरीबरोबर ते सहज उडून जाते आणि पहिल्या सरीबरोबरच उगवते आणि मग तुळशीचे बनच्या बनच उगवते.

अनिवार साधेपणाचे तुळशीचे लहानखोरे रूप भारतीय मनात प्रांतोप्रांती वसले आहे. विष्णूच्या प्रणयिनीत ही नायिका लाजाळू असते. ही तुळस हाडामासाची स्त्री नाही तर ते एक झाड आहे. हा झाडरुपी देह असा आहे की त्याचा कायीक संपर्क कुणाही पुरुषाशी होणारच नाही. तिचे बारोमास फुलणारे पुष्पमय हृदय मात्र प्रियकराचे अखंड सानिध्य शोधत असते. तुळशीचे लग्नही बाळकृष्णाशी होते. ही सुद्धा तिच्या भोगरहित सौभाग्याची आणि अखंड कौमार्याचीच खूण आहे. लग्नाशिवाय स्त्रीने राहू नये. जी राहील ती पतिव्रता असायची नाही, असे मत पुराणात स्वच्छ दिलेले आढळते. म्हणून तुळशीच्या लग्नाचा हा पसारा मांडण्यात आला आहे. तुळस ही उत्कंठित प्रेमला असली तरी ती चिरकुमारी आहे, हेच या प्रथेचे अंतिम सार आहे. ही कल्पना महाराष्ट्रात पूर्वापार रुढ आहे. उदाहरणार्थ, कुमारिकेच्या चोळीवर तुळशीशिवाय दुसरा कोणताही कशिदा काढायचा नाही असा नियमच महाराष्ट्रात नागपूरच्या परिसरामध्ये अजूनपर्यंत रूढ होता. तुळशीबद्दलच्या सर्व कथांचे एकमेव वैशिष्ट्य असे की त्या भीषण कारुण्याने भरलेल्या कथा आहेत.' तुळशीबद्दल दुर्गाबाई भागवतांचे हे भाष्य वाचल्यावर मला तुळशीची वेदना मुळापासून जाणवली. किती अवघड दिव्य पार केल्यावर तिला भारतीय संस्कृतीमध्ये मानाचं स्थान मिळालं आहे. मला लोकगीतातल्या दोन ओळी आठवल्या.

तुळशी गं बाई,
काय तुझं हे जीणं, गोविंदाच्या संगे,
वरसा वरसाला लगीन'

दुसऱ्या स्त्रियांची दुःखं ऐकून घेणारी ही तुळस स्वतःच वेदनांचं एक मूर्तिमंत रूप आहे. तुळशीचा विवाह सोहळा कार्तिक शुद्ध द्वादशी ते कार्तिक शुद्ध पौर्णिमेपर्यंत केला जातो. ऊस हा मामा म्हणून तिच्या पाठी उभा असतो. तुळशी विवाहानंतरच लग्नाचे मुहूर्त काढण्याची पद्धत आहे.

आयुर्वेदात अनेक औषधांमध्ये तुळशीचा वापर केला जातो. सर्दी, खोकला, ताप या औषधांमध्ये तुळस असतेच. त्वचारोग आणि कृमींवर तुळस अतिशय परिणामकारक आहे. तिच्यात असणारे 'थायमॉल' हे तत्व डास, कीटकांना दूर ठेवतं. अशी ही बहुगुणी तुळस. तिच्या पानाशिवाय नैवेद्य परिपूर्ण होत नाही. मृत व्यक्तीच्या मुखातही तुलसी पत्र ठेवण्याची प्रथा आहे. धार्मिक, पौराणिक, पर्यावरणपूरक, आरोग्यदायी असणारी आणि स्त्रीची सखी असणारी ही तुळस सगळ्यांच्या घरी प्रवेशद्वारीच असते.

पूजने कीर्तने ध्याने,
रोपणे धारणे कलो।
तुलसी दहते पापं,
स्वर्गं मोक्षं ददातिच ।।

अशा या तुळशीचे पूजन प्रत्येक घरात व्हावं असं शास्त्र सांगतं. श्रीकृष्णासारख्या महानायकाच्या पत्नीचं पद तिला मिळालं पण पूर्वायुष्यात चारित्र्यहीनतेच्या आरोपातून गेल्यावरच. दर वर्षी विवाहवेदीवर चढून आपलं पत्नीत्व सिद्ध करण्याचं दिव्य तिला करावं लागतं, तरीसुद्धा श्रीकृष्ण पत्नीचा पहिला मान रुक्मिणीचा असतो. अशा या तुळशीच्या व्यथा समजून घेऊन प्रत्येक भारतीय स्त्रीने तिला योग्य तो सन्मान देऊन जास्तीत जास्त रोपांचं संगोपन करावं हीच काळाची गरज आहे. ■■

रम्य तो कार्तिक

यंदा नेहमीच्या तुलनेत पाऊसकाळ कमी झाला. अनेक भागांमध्ये पावसाने सरासरीदेखील गाठली नाही. त्यामुळे यंदा थंडीने तरी चांगली साथ द्यावी, अशी सर्वांची इच्छा आहे. सहाजिकच थंडीचे साम्राज्य सर्वदूर पसरेल या आशेने सगळे सुखावत आहेत. कार्तिक महिना आल्हाददायक थंडी घेऊन येतो. खेरीज हा मास नेहमीच एक निवांतपणाही घेऊन येतो. भटकंतीचे बेत पूर्णत्वास जातात ते याच महिन्यात... चला तर, त्याचे स्वागत करु या.

वैष्णवी कुलकर्णी

दिवाळीचे दिवस भारलेले असतात. एकीकडे सणासुदीच्या आनंदलहरी दीर्घकाळ रेंगाळत असताना दुसरीकडे गुलाबी थंडी तनामनास सुखावत असते. ऋतूपालट होत असतानाचे हे आल्हाददायक वातावरण आहार-विहारात अनेक बदल घडवून आणते. अगदी प्रावरणांपासून दररोजच्या जेवणापर्यंतच्या अनेक गोष्टी बदलतात आणि हा हवाहवासा वेगळेपणा जगण्यातील एकसुरीपणा संपवून टाकतो. कार्तिकाच्या आगमनाकडेही आपण याच सकारात्मकतेने पाहतो.

पाऊस संपल्यानंतर रणरणत्या उन्हाचे काही दिवस अनुभवल्यानंतर कार्तिकात बदलते वातावरण मोहवून न टाकेल तरच नवल. खरे तर पावसाळ्याच्या अखेरच्या चरणापासूनच धुक्याची अंधुक माया दाटून येऊ लागलेले असते. तेव्हापासूनच येऊ घातलेल्या थंडीचा स्पर्श जाणवण्यास सुरूवात होते. पण कार्तिकात तिचे प्रत्यक्ष आगमन होते आणि ऋतूचा नूर पालटतो. त्यामुळेच कार्तिकाचे आगमन वातावरणात एक वेगळीच रम्यता आणते. एकीकडे दिवाळीसारख्या सणाचे पावन पर्व, शेताशिवारांमध्ये घमघमणारा नव्या धान्याचा सुगंध, उंबऱ्यावर येऊन ठेपलेली लग्नसराई आणि दिवाळीनंतरच्या काळातील सणांची लगबग या सगळ्यामध्ये कार्तिकाला मांगल्याचा टिळा न लागता तरच नवल. आताही असाच एक भक्तिपूर्ण मास सुरू झाला आहे.

यंदा नेहमीच्या तुलनेत पाऊसकाळ कमी झाला. अनेक भागांमध्ये पावसाने सरासरीदेखील गाठली नाही. त्यामुळे यंदा थंडीने तरी चांगली साथ द्यावी, अशी सर्वांची इच्छा आहे. सहाजिकच थंडीचं साम्राज्य सर्वदूर पसरेल या आशेने सगळे सुखावत आहेत. कार्तिक महिना नेहमीच एक निवांतपणा घेऊन येतो. त्यामागील एक कारण म्हणजे एक मोठे आणि दमवणारे उत्सवपर्व संपत असते. खरेदीची धामधूम पार पडलेली असते. घराचे सुशोभीकरण, भेटीगाठींची देवाणघेवाण, पाहुण्या-राऊळ्यांची उठबस, एकमेकांकडे रंगणाऱ्या मेजवान्या या सर्वांची पूरक साखळी थोड्या-फार फरकाने सुरूच असली तरी पहिला बहर ओसरलेला असतो. सणांच्या निमित्ताने जास्त खाल्लेले चार घास तनामनावर परिणाम दाखवत असतात. आता व्यायाम करायलाच हवा, असा मनोमन होणारा संकल्प स्मरत असतो. पण चांगली थंडी पडेपर्यंत अनेकांचे पाय उंबऱ्यातच घोटाळत असतात. कार्तिक हा असाच असतो.

कार्तिक शुद्ध प्रतिपदेच्या दिवशी विक्रम संवत्सर या कालगणनेच्या नव्या वर्षाचा प्रारंभ होतो. दिवाळी पाडव्याचा हा मंगल दिवस. बळीची पूजा करणे, पहाटे स्नान करुन देवदर्शनाला जाणे, गोवर्धनाची पूजा करणे, बळी नावाच्या प्रतापी आणि लोककल्याणकारी राजाचे स्मरण करुन पूजन करणे हे सगळे विधी दर वर्षी भक्तीभावाने साजरे होतात. कार्तिक द्वादशीचा दिवसही असाच आनंदात साजरा होणारा. भाऊबीजेचा हा दिवस भावा-बहिणीच्या प्रेमळ नात्यामध्ये नवे रंग भरुन जातो. त्यानंतर सुरू होतो तुळशी विवाहाचा उत्साह. सध्या 'लिव्ह इन रिलेशन'चे दिवस आहेत! लग्नसंस्थेच्या कक्षा आक्रसत आहेत. सध्याचे तरुण लग्नबेडीत अडकताना शंभर नव्हे तर हजार वेळा विचार करत आहेत. अर्थात असे असले तरी दर वर्षी तुळशीचे लग्न मात्र धुमधडाक्यात पार पडते.

तुळशीच्या लग्नाचा सोहळा भक्तिमार्गातील एक उत्सवी टप्पा आहे. या दिवशी श्रीकृष्ण आणि तुळशीचा विवाह विधिवत संपन्न होतो. हे मंगलकार्य घरोघरी आबालवृद्धांच्या साक्षीने पार पडते. यानिमित्त घराचे सुशोभिकरण होते. दारात छोटेखानी मंडप पडतो. तुळशीवृंदावन गेरुने रंगवले जाते. तुळशीभोवती नवी माती भरली जाते. विवाहाच्या दिवशी गोरज मुहूर्तावर समारंभ रंगतो. वृंदावन रांगोळ्याच्या गालिच्यांनी सुशोभित होते. एका कोपऱ्यात ऊस रोवले जातात. एका छोट्या खड्ड्यात आवळे आणि चिंचादेखील टाकतात. ही सजावट हौस आणि इच्छेनुसार कितीही भव्य आणि दिमाखदार असू शकते. तुळशीला सौभाग्यलेणे अर्पण केले जाते. नवे वस्त्र ल्यालेली तुळस मोठी गोजिरवाणी दिसते. त्यानंतर तुळशीशेजारी श्रीकृष्णाची मूर्ती ठेवली जाते. विवाहसमयी या दोघांमध्ये

आंतरपाट धरला जातो. उपस्थितांना अक्षता वाटल्या जातात. गुरुजी मंगलाष्टके म्हणतात आणि या जोडप्यावर अक्षतांचा वर्षाव होतो. उपस्थितांना अल्पोपहार दिला जातो. आजही बहुसंख्य घरांमध्ये तुळशीविवाहाचा हा सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न होतो. तुळशीच्या लग्नानंतरच लग्नसराई सुरू होते.

या विधीमागे विविध कथा सांगितल्या जातात. श्रीकृष्णाला प्रिय असणाऱ्या तुळशीला राधेने मनुष्य होण्याचा शाप दिला. त्याप्रमाणे तिने कुरुप-काळ्या रुपात जन्म घेतला. या रुपामुळे कोणीही वर मिळत नसल्याने पित्याने तिचा त्याग केला. निराश अवस्थेत तुळशीने जीवन संपण्याचा निर्णय घेतला आणि ती भूमीत गडप होऊ लागली. मात्र नेमक्या त्याच वेळी सावळ्या विठ्ठलाला आपल्या पूर्व अवतारातील वचनाचे स्मरण झाले आणि वचनपूर्तीसाठी त्याने भूमीत गडप होऊ पाहणाऱ्या तुळशीला ओढून बाहेर काढले. तेव्हा तुळशीचे रोप बाहेर आलेले पाहून त्याने रोपट्याशी विवाह केला आणि वचनाची पूर्तता केली. तेव्हापासून तुळशी विवाहाची प्रथा सुरू असल्याचे एक लोककथा सांगते. कार्तिकात आवळी भोजन संपन्न होतं. हे दिवस आवळ्याला बहर येण्याचे आहेत. आवळा आरोग्यासाठी गुणकारी असतो. यातील औषधी घटकांमुळे मानवी शरीराला अनेक लाभ मिळतात. याचे स्मरण करुन देण्यासाठीच कदाचित कार्तिक शुद्ध अष्टमीपासून पौर्णिमेपर्यंत आवळीभोजन पार पडतं. यावेळी आवळ्याच्या झाडाखाली स्वयंपाक केला जातो. सहकुटुंब भोजनाचा बेत रंगतो. जेवणाच्या आधी आवळ्याच्या झाडाला श्रीफल अर्पण केले जाते. झाडाची पूजा करुन त्याभोवती चारही बाजूला तुपाचे दिवे लावले जातात. आवळ्यावर वात लावून झाडाला औक्षण केले जाते. हे उपचार पार पडल्यानंतर जेवणाचा फक्कड बेत रंगतो. सगळेजण आनंदात वनभोजनाचा आनंद लुटतात. म्हणूनच बहरलेल्या वातावरणाचे शारीरिक आणि मानसिक लाभ लुटण्याची संधी देणारा कार्तिकातला हा उत्तम रिवाज आहे असे आपण म्हणू शकतो.

कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशी कार्तिक एकादशी म्हणून महत्त्वाची असते. प्रबोधिनी एकादशी अशी ओळख असणाऱ्या या दिवशी चातुर्मासाची समाप्ती होते. या दिवशी श्रीविष्णुची निद्रा पूर्ण होते आणि ते जागे होतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. वारकऱ्यांसाठी हा दिवस विशेष महत्त्वाचा असतो. या एकादशीला पंढरपूरमध्ये मोठी यात्रा भरते. छोट्या एकादशीला भक्तांची मांदियाळी चंद्रभागेच्या वाळवंटी एकवटते. विठ्ठलनामाचा गजर आसमंतात घुमतो. लाखो भाविक पंढरीरायाचे दर्शन घेऊन कृतकृत्य भावनेने परततात. या तीर्थक्षेत्री प्रचंड जनसमुदाय असतोच पण तिथपर्यंत पोहोचू न शकणारे भक्त आपापल्या गावातील, शहरातील विठ्ठल मंदिरांमध्येही मोठी गर्दी करतात. भजन-कीर्तनादी कार्यक्रमांमुळे वातावरणाचा भक्तीचा रंग मिसळतो. या दिवशी उपवास केला जातो. कर्तिक पौर्णिमा हादेखील या महिन्यातला विशेष दिवस आहे. त्रिपुरी पौर्णिमा म्हणून हा दिवस ओळखला जातो. या पौर्णिमेला मध्यरात्री शिव आणि विष्णू एकमेकांना भेटतात अशी श्रद्धा आहे. म्हणूनच त्यावेळी बेल आणि तुळस वाहून शिव-विष्णूची पूजा केली जाते. ही रात्र लक्ष पणत्यांच्या प्रकाशात न्हाऊन निघते. या सायंकाळी अंगणात, मंदिरात पणत्या लावल्या जातात. मंदिरांमधील दीपमाळा उजळून निघतात. एक प्रकारे ही देवांची दिवाळीच असते. या दिवशी शिवमंदिरात विशेष वर्दळ असते. कार्तिक पौर्णिमेला शिवमंदिरात त्रिपूर वाती लावतात. दीपपात्रात ७५० वाती पेटवल्या जातात. एवढ्या वाती जळायला बराच वेळ लागतो. तेवढा वेळ देवाच्या नामस्मरणात घालवला जातो. वाती न जाळता तेवढाच कापूर जाळूनही या व्रताची सांगता होते. या दिवशी महादेवाने त्रिपुरासुराचा नाश केला. त्या विजयाच्या स्मृती म्हणून या दिवशी हा दीपोत्सव साजरा केला जातो. या संपूर्ण महिन्यात पहाटे लवकर उठून स्नान करण्याचे व्रतही अंगिकारले जाते. यालाच कार्तिक स्नान म्हणतात. तर असा आहे हा पवित्र महिना. आपणही या महिन्यातील ऋतूबदलाचा आनंद लुटू या. बदलत्या ऋतूचे उत्साहाने स्वागत करु या. ■■

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)